आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range...
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ०४.०८.२०२५ | अंक नं. १०७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

आला रे आला राजपाल सेल आला..!
स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# नगरमध्ये एकाच रात्रीत अनेक दुकाने चोरट्यांनी फोडली; चितळे रोड, सर्जेपुरा येथील घटना, चोरटे सीसीटीव्हीत कैद

नगर – नगर शहरात अतिशय गजबजलेल्या चितळे रोड, सर्जेपुरा भागातील अनेक दुकाने चोरट्यांनी एकाच रात्रीत फोडली आहेत. काही ठिकाणाहून रोकड चोरीला गेली असून काही ठिकाणी चोरीचा प्रयत्न झाल्याच्या घटना ४ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास घडल्या आहेत. सदर चोरटे हे एका मोटारसायकलवर आले होते, असे सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसून आले आहे. त्या मोटारसायकलच्या नंबर वरून पोलिसांनी शोध घेण्याचा प्रयत्न केला असता ती मोटारसायकल माळीवाडा परिसरातून चोरीला गेली असल्याची माहिती समोर आली आहे.

शहरातील चितळे रोडवरील डी चंद्रकांत टेलर या दुकानाचे शटरचे कुलूप तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. आतील टेबलच्या काउंटरमध्ये असलेली सुमारे दोन ते अडीच लाखाची रोख रक्कम चोरुन नेली. ही घटना सकाळी निदर्शनास आली. त्यानंतर डी चंद्रकांत टेलर दुकानाचे संचालक चंद्रकांत दुलम यांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधला. कोतवाली पोलिस, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी पोलीस उपनिरीक्षक राजू वाघ व पोलीस अंमलदार तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यांनी घटनास्थळाची पाहणी करुन दुलम यांच्याकडून माहिती घेऊन सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले.

त्याचबरोबर छाया टॉकिज समोर असलेल्या हॉटेल प्यासा व त्या शेजारी असलेल्या कल्पेश बियर ॲण्ड वाइन दुकानाचे शटरही चोरट्याने उचकटल्याचे निदर्शनास आले. परंतु चोरट्याने शटर उचकटून आत प्रवेश न करता तिथून निघून गेल्याचे समजते. याशिवाय सर्जेपुरा परिसरातील सागर मोटर्स हे स्पेअरपार्टचे दुकानही चोरट्यांनी फोडले आहे. पोलिसांनी पाहिलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये चोरट्यांनी वापरलेली मोटारसायकल दिसून आली. मोटारसायकलच्या नंबर वरुन पोलिसांनी माहिती घेतली असता सदर मोटारसायकल ही माळीवाडा येथील पांचपीर चावडी येथून काही दिवसापूर्वी चोरीस गेलेली असल्याची समजते.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस सीसीटीव्हीटीच्या आधारे तांत्रिक विश्लेषण करून चोरट्यांचा मागोवा घेत आहे. चोरी झालेल्या दुकानांपैकी डी चंद्रकांत टेलर यांचे दुकान कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत असून इतर दुकाने हे तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत आहेत.

याप्रकरणी दुपारी उशिरापर्यंत पोलीस ठाण्यामध्ये चोरीच्या घटनेची नोंद घेण्याची प्रक्रिया सुरू होती.




चितळे रोडवरील डी. चंद्रकांत व हॉटेल प्यासा चे शटर चोरट्यांनी उचकटले त्याची पाहणी करताना नागरिक. (छाया – लहू दळवी, बबलू शेख)

# दोन वर्षांपासून पाठपुरावा करूनही पोलिस चौक्या बंदच

नगर – चितळे रोडवरील पोलिस चौकी गेल्या अनेक दिवसांपासून बंद आहे. या चोऱ्या पोलिस चौकीच्या शेजारीच झालेल्या आहेत. ही चौकी सुरु करावी म्हणून परिसरातील नागरिक गेल्या २ वर्षांपासून पाठपुरावा करत आहेत. मात्र पोलिस प्रशासनाकडून या मागणीकडे दुर्लक्ष केले जात आहे. मागील जुलै महिन्यातही या भागातील व्यावसायिक तसेच नागरिकांनी पोलिस अधीक्षकांना निवेदन दिलेले आहे. या शिवाय हरियाली संस्था, स्नेहालय, महिला विकास व शिक्षण संस्था, सावली दिव्यांग संघटना आदींनीही अनेकदा निवेदने दिलेली आहेत. तरीही विविध कारणे सांगत ही पोलिस चौकी सुरु करण्यात आलेली नाही.

दरम्यान चितळे रोडप्रमाणेच शहरातील गंज बाजार, मार्केटयार्ड या पोलिस चौक्याही बंदच आहेत.




### पोलिस चौकी बंद, बाजारपेठेची सुरक्षा रामभरोसे...

नगर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेली गंज बाजार पोलीस चौकी गेल्या अनेक वर्षापासून बंद आहे. त्यामुळे बाजारपेठेतील मोठ्या दालनासह सुमारे अडीचशे सराफ दुकानदारांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच अतिक्रमणांमुळे रस्ते अरुंद झालेले असल्याने एखादी चोरीची मोठी घटना घडल्यानंतर पोलिसांनाही वेळेत पोहोचता येत नाही. त्यामुळे ही बंद पडलेली चौकी सुरू करण्याची मागणी सराफ व्यवसायिकांकडून होत आहे. (छाया –धनेश कटारिया)

# तलाठी असल्याचे सांगून महिलेची फसवणूक; सोन्याचे दागिने लंपास

नगर – मी तलाठी आहे. तुमचे संजय गांधी निराधार योजनेचे बंद झालेलं खाते मी पुन्हा सुरु करतो, असे सांगून एका अनोळखी इसमाने एका वृद्ध महिलेचा विश्वास संपादन करुन ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने फसवून चोरुन नेले. ही घटना नगर पुणे रोड वरील केडगाव येथील डॉ. जोशी हॉस्पिटल जवळ घडली.

याबाबत आशाबाई बापू काळे (वय ५५, रा. जिल्हा परिषद शाळेसमोर,खडकी, ता. नगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.फिर्यादी या त्यांच्या चुलतीसह (सरस्वती भाऊसाहेब कोठुळे) केडगाव येथील जोशी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी गेल्या होत्या. डॉक्टरांनी तुमचा नंबर दुपारी १ वाजेपर्यंत येईल असे सांगितल्याने त्या दोघी बाहेर बसल्या होत्या.दुपारी १ वाजण्याच्या सुमारास एक अनोळखी इसम त्यांच्या जवळ येऊन मी तलाठी आहे, तुमच्या गावातील खूप लोक माझ्या ओळखीचे आहेत. तुमचे संजय गांधी निराधार योजनेचे खाते बंद पडले आहे, मी ते सुरु करुन, पैसे काढून देतो. चला माझ्यासोबत अरणगावच्या बँकेत, असे सांगून त्याने फिर्यादींचा विश्वास संपादन केला.

फिर्यादीने त्याच्यावर विश्वास ठेवून त्याच्या मोटारसायकलवर बसून त्याच्यासोबत निघाल्या. त्याने त्यांना केडगाव ते अरणगाव रोड ने नेले. अरणगाव रेल्वे ब्रिज बोगद्याजवळ मेहेर बाबा गेट समोर आल्यानंतर त्या इसमाने खाते सुरु करायचे असल्यास खर्च येतो, असे म्हटले. यावर फिर्यादी यांनी आता माझ्याकडे पैसे नाही असे सांगितले. त्यावर त्या इसमाने कानातले दागिने माझ्याकडे द्या, खाते सुरु झाल्यावर दागिने परत घेऊन जा. असे सांगितले. त्यावर फिर्यादी यांनी त्याला ४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे वेल व ३ ग्रॅमचे घुंगराचे झूल दिले. मात्र, इसमाने त्यानंतर फिर्यादी महिलेस कोणत्याही बँकेत न घेता थेट अरणगाव येथे सोडून पसार झाला.हा प्रकार लक्षात आल्यानंतर फिर्यादीने आपल्या भावास घटनेबाबत सांगितले.अन कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी धाव घेतली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आशाबाई काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अनोळखी इसमाविरुद्ध बी एन एस कलम ३१९(१), ३१६ (२), ३१८ (४) प्रमाणे फसवणूकीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस हवालदार गोल्हार हे करीत आहेत.

# एमआयडीसीतील कंपनीच्या बाथरुममध्ये गळफास घेत तरुण कामगाराची आत्महत्या

नगर – एमआयडीसी येथील कंपनीमधील बाथरुम मध्ये २० वर्षीय परप्रांतीय कामगाराने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना एमआयडीसी येथील एफ ५१ गणेश इंडस्ट्रीज या कंपनीत ३ ऑगस्ट रोजी रात्री ९.१५ वाजण्याच्या सुमारास घडली. विकास गंगाधर बोरा (वय २० वर्ष, रा.गोथरा वस्ती, गोपुर जि.विश्वनाथ, राज्य आसाम. हल्ली रा. गणेश इंन्डस्ट्रिज एफ ५१ एमआयडीसी अ.नगर) असे आत्महत्या केलेल्या तरुणांचे नाव आहे.

विकास बोरा याने आत्महत्या केल्याचे निदर्शनास येताच त्याचा भाऊ अनुप बोरा याने त्यास औषधोपचाराकरिता सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्यास तपासून तो उपचारापूर्वी मयत झाला असल्याचे घोषित केले.

याप्रकरणी सिव्हील हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. खेडकर यांच्या अहवालानुसार एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार सुशांत दिवटे हे करीत आहेत.

पाहिजेत
अहिल्यानगरमधील नामांकित सुवर्णदालन चंदुकाका ज्वेल्स, सावेडी येथील शोरूमसाठी हवे आहेत.
सुवर्णक्षेत्रात करिअर करण्याची सुवर्णसंधी.
सेल्समन
जागा : 5 (महिला)
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
विविध ठिकाणचा अनुभव असल्यास प्राधान्य
पगार : 13000/- ते 14000/- पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
पार्टटाईम सेल्समन
जागा : 2 (महिला)
मोड विभाग कारागिर
जागा : 2 (पुरूष)
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
सोने-चांदीच्या मोड विभागाचा अनुभव आवश्यक
पगार : 16000/- ते 17000/- पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
मार्केटिंग प्रतिनिधी
जागा : 1 (पुरूष)
मार्केटिंग पदावर काम केल्यास प्राधान्य.
पगार : 14000/- ते 15000/- पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
ड्रायव्हर
जागा : 2 (पुरूष)
अनुभवी व निर्व्यसनी, लायसन्स असणे आवश्यक
पगार : 18000/- ते 19000/- पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
इच्छुक उमेदवारांनी सविस्तर अर्ज बायोडाटासह मंगळवार ते शुक्रवार सकाळी 11 ते 2 यावेळेत समक्ष भेटावे.
चंदुकाका ज्वेल्स सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02

CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION | TAXATION, BANKING
ADVANCE ACCOUNTING | AUDITING
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistan
CAA IS NOT JUST A COURSE BUT A GREAT INVESTMENT IN YOUR CAREER
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
100% JOB ASSISTANCE
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# व्हॉट्स ॲप चॅटबॉटच्या माध्यमातून मनपाची नागरिकांसाठी 'ऑनलाईन सेवा' उपलब्ध

**शासकीय योजना, विभागांची माहिती, ऑनलाईन परवानग्या, दाखल्यांसाठी मिळणार सुविधा; मोबाईलवरून घरबसल्या तक्रार नोंदवता येणार : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे**

नगर - महानगरपालिकेचे प्रशासकीय कामकाज ई ऑफिस प्रणालीच्या माध्यमातून बहुतांश प्रमाणात ऑनलाईन स्वरूपात सुरू झाले आहे. आता महानगरपालिकेने नागरिकांना ऑनलाईन सेवा व सुविधा, तसेच घरबसल्या मोबाईलवरून ऑनलाईन तक्रार नोंदवण्यासाठी व्हॉट्स ॲप चॅटबॉटच्या माध्यमातून सेवा उपलब्ध करून दिली आहे. ४ ऑगस्टपासून ही सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध होणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १५० दिवसांच्या कृती कार्यक्रम ांतर्गत नागरिकांना आवश्यक असलेल्या विविध सेवा, सुविधा व माहिती ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महानगरपालिकेच्या चॅटबॉटसाठी ९१७५६७५२३२ हा क्रमांक उपलब्ध करून दिला आहे.

यशवंत डांगे म्हणाले की, अहिल्यानगर महानगरपलिकेतर्फे महानगरपालिका हद्दीमधील नागरिकांसाठी विविध प्रकारची कामे केली जातात. नागरिकांना विविध प्रकारच्या सेवा देण्यात येतात. नागरिकांसाठी विविध प्रकारचे उपक्रमही राबविण्यात येतात. या कामाची, सेवांची व उपक्रमांबाबतची माहिती नागरिकांना मिळावी, यासाठी विविध समाज माध्यमांचा वापर केला जात आहे. वृत्तपत्र, रेडिओ, टीव्ही चॅनेल, वेबसाईट, फेसबुक, इंस्टाग्राम, एक्स (ट्विटर), यूट्यूब चॅनेल, व्हॉट्स ॲप चॅनेल आदींचा वापर सध्या महानगरपालिका करत आहे.



व्हॉट्स ॲप चॅटबॉटच्या माध्यमातून मनपाची नागरिकांना ऑनलाईन सेवा उपलब्ध करून मनपा आयुक्त यशवंत डांगे. (छाया - लहू दळवी)

नागरिकांनी ९१७५६७५२३२ या मोबाईल क्रमांकावर HI मेसेज टाईप करून पाठवल्यास त्यांना मुख्य सूची असा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक केल्यास त्यांना तक्रार निवारण, नागरी सेवा व सुविधा, विभागाचे माहिती, आपत्कालीन सेवा, सामाजिक माध्यमे, शासन स्तरावरील योजना, रुग्णालये व आरोग्य असे पर्याय दिसतील. तक्रार निवारणमध्ये नागरिकांना विविध प्रकारच्या तक्रारींची पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. पाणीपुरवठा, घनकचरा, रस्ते, वृक्षतोड आदींबाबत नागरिक आपली तक्रार नोंदवू शकतात.

नागरी सेवा व सुविधामध्ये नागरिकांना विविध प्रकारच्या सेवांची माहिती मिळण्यास मदत होईल. महाराष्ट्र लोकसेवा हक्क, जन्म- मृत्यू प्रमाणपत्र, मांडव परवानगी, होर्डिंग, बॅनर परवानगी आदींची माहिती मिळेल. विभागाची माहिती यामध्ये नागरिकांना अहिल्यानगर महापालिकेतील विविध विभागांची माहिती मिळणार आहे. आपत्कालीन सेवा यामध्ये नागरिकांना अहिल्यानगर महानगरपालिकेतील आपत्कालीन सेवा संबंधित विभाग प्रमुख यांचा संपर्क क्रमांक देण्यात आलेला असून त्यावर ते आपत्कालीन वेळेस त्यांना संपर्क करू शकतील. सामाजिक माध्यमे यामध्ये महानगरपालिकेची विविध प्रकारची सामाजिक माध्यमे (उदा. फेसबुक, इंस्टाग्राम इ.) यांची लिंक देण्यात आलेली आहे. त्यावर क्लिक करून नागरिकांनी फॉलो केल्यास त्यांना दैनंदिन अपडेट्स प्राप्त होतील.

शासन स्तरावरील विविध योजना यामध्ये नागरिकांना शासन स्तरावर राबवल्या जात असलेल्या विविध योजनाबद्दल माहिती मिळण्यासाठी शासनाच्या विविध संकेत स्थळांची लिंक देण्यात आलेली आहे. महापालिका रुग्णालय व आरोग्य केंद्र यामध्ये अहिल्यानगर महापालिकेतील दवाखाने व आरोग्य सेवा केंद्र तसेच खाजगी रुग्णालय याबाबतची माहिती नागरिकांना मिळण्यास मदत होणार आहे. तसेच आरोग्य सेवा केंद्र व दवाखाने यांचे गुगल मॅपद्वारे नागरिकांना लोकेशन मिळणार आहे, असे यशवंत डांगे यांनी सांगितले.

## प्रेरणादायी अक्षरधन

'मुसाफिर'-९८२२०२०६९१

### कालान्तर - ज्येष्ठ संपादक टिकेकरांचे पुस्तक



सामाजिक, राजकीय आणि 'चावडीमय' गप्पा मारणाऱ्यांसह सुजाण श्रोत्यांना, नागरिकांना गत ६-७ दशकातील सामाजिक व सांस्कृतिक पडझडीचा आलेख म्हणजे ज्येष्ठ संपादक अरुण टिकेकर यांचे 'कालान्तर' हे वाचनीय पुस्तक.

गेल्या ५०-६० वर्षात आपल्या समाजात झालेल्या पडझडीचे चित्रण करण्याचा प्रयत्न रोहन प्रकाशनच्या या पुस्तकात करण्याचा प्रयत्न आहे.

स्वातंत्र्याच्या कालखंडात महाराष्ट्राने काय गमावले, काय कमावले याचा आलेख काढणारा. त्यात कमावण्याच्या बाजूला थोडेच अन् गमावण्याच्या बाजूला भरपूर असल्याचे आढळते. समाजाबद्दल तर होत होता. तो केवळ बाह्यस्वरुपी होत आहे का केवळ तंत्रज्ञानाने आपल्या जीवनात अमूलाग्र बदल घडवून आणले आहेत, की समाजमन वैज्ञानिक विचारांची कास धरुन विवेकवादी होत आहे, धर्माचे अवडंबर कमी होत आहे की वाढत आहे असे प्रश्नही मनात येवू लागले आहेत.

अरुणजी आपल्या मनोगतात पुढे म्हणतात, प्रश्नांची उत्तरे शोधू गेल्यास ध्यानात येते की, ज्या प्रकारची पडझड झाली आहे ती स्वागतार्ह बदलापेक्षा किती तरी अधिक आहे.

या कालखंडात आपण काय मिळवले आणि काय गमावले याची चर्चा तर केली पाहिजे.

शिक्षणापासून ते वेगवेगळ्या व्यवसायापर्यंत, समाजकारणापासून ते राजकारणापर्यंत, व्यक्तीगत जीवनापासून ते सार्वजनिक जीवनापर्यंत विविध क्षेत्रातील पडझडीची चर्चा करणे एवढाच या लेखसंग्रहाचा मर्यादित हेतू असे ते म्हणतात.

यानिमित्त खरोखरच वाटते कुठे होता महाराष्ट्र आपला? नक्की कुठे चाललाय? फक्त भ्रष्टाचार व स्वार्थाने परिसीमा गाठलीय. वैयक्तिक व सार्वजनिक नितीमत्ता विवेक हरवत चाललाय. लोकशाहीच्या चारही खांबांना सशक्त होऊन हे राज्य नव्याने पुढे आणावे लागेल.

## नवीन प्रभाग रचनेनुसार व ओबीसी आरक्षणासह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना हिरवा कंदील : सर्वोच्च न्यालायालायचा निर्णय

मुंबई - महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका या नवीन प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासह करण्याला सर्वोच्च न्यायालयाने हिरवा कंदील दाखवला आहे. यासंबंधी नवीन प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या.

वॉर्ड किंवा प्रभाग रचना हा पूर्णपणे राज्य सरकारचा अधिकार असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. या संबंधित दोन याचिका न्यायालयाने फेटाळल्या आहेत. त्यामुळे राज्य सरकारने आदेश दिल्यानुसार, नवीन प्रभाग रचनेनुसारच राज्यातील निवडणुका होणार आहेत.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या मे २०२१ पासून रखडल्या आहेत. ओबीसी आरक्षणासंबंधी एक याचिका दाखल करण्यात आली होती. त्यामुळे या निवडणुका रखडल्या होत्या. त्यामुळे या निवडणुका ओबीसी आरक्षणानुसारच घेण्यात याव्यात असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुसार नवीन प्रभाग रचनेचे आदेश राज्य सरकारने दिले होते.

गेल्या महिन्यात, ६ मे २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने या संबंधित निर्देश देऊन राज्य सरकारला निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. प्रभाग रचना करण्याचा अधिकार हा पूर्णपणे राज्य सरकारचा असल्याचं त्यावेळीही कोर्टाने सांगितलं होतं. त्यानुसार राज्य सरकारने आदेशही दिले होते. परंतु लातूरमधील औसा नगलालिकेसंबंधी एक हस्तक्षेप याचिका दाखल करण्यात आली. आता सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे.


## दुचाकीवरुन दारुची वाहतूक; दोघांना मुद्देमालासह पकडले

नगर - गावठी हातभट्टीची तयार दारु विनापरवाना विक्री करण्याचे उद्देशाने बाळगून वाहतूक करणाऱ्या दोघांना नगर तालुका पोलिसांनी पकडले. त्यांच्याकडील २२ लिटर गावठी दारु आणि मोटारसायकल असा १२ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई नगर तालुक्यातील खांडके गावचे शिवारात आगडगाव जाणारे रोडवरील पवारतांडा येथे २ ऑगस्ट रोजी रात्री ११.३० वाजण्याचे सुमारास करण्यात आली.

या बाबतची माहिती अशी की नगर तालुका पोलीस खांडके गावाच्या शिवारात रात्री गस्त घालत असताना आगडगावकडे जाणाऱ्या रोडवर पवार तांड्याजवळ मोटारसायकलला दोन कॅन लावून चाललेले दोघे मिळून आले. पोलिसांना त्यांचा संशय आल्याने पोलिसांनी त्यांना थांबवुन हटकले असता त्यांनी त्यांची नावे गोकुळ राजेंद्र धायगुडे (वय २५, रा झापवाडी, ता. नेवासा), प्रदिप उर्फ बबलु गजानन आल्हाट (वय ४४, रा.पिंपळगाव उज्जैनी, ता.नगर) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्यांना कॅनमध्ये काय घेऊन चालले असे विचारले असता त्यांनी समाधानकारक उत्तर दिली नाही. त्यामुळे पोलिसांनी कॅनची पाहणी केली असता त्यामध्ये २ हजार २०० रुपये किंमतीची २२ लिटर गावठी हातभट्टीची तयार तयार दारु मिळून आली. पोलिसांनी कॅनमधील दारु आणि १० हजार रुपये किमतीची टी. व्ही.एस कंपनीची मोटारसायकल (क्र. एम एच १६ एन ३५७८) असा एकूण १२ हजार २०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात पो. कॉ. राहुल कोतकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गोकुळ धायगुडे व प्रदीप आल्हाट यांचेविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कायदा कलम ६५ (ई) (अ) प्रमाणे, गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस नाईक लोखंडे हे करीत आहेत.

## हाजी कादिर अहमद यांचे दुःखद निधन



नगर - सार्वजनिक बांधकाम विभागातील सेवानिवृत्त अधिकारी, मुकुंदनगर येथील रहिवाशी हाजी शेख अ. रऊफ हाजी अ. जब्बार उर्फ हाजी कबीर अहमद यांचे २ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्यामागे दोन भाऊ व दोन बहिणी आहेत. ते अत्यंत धार्मिक व मनमिळाऊ स्वभावाचे होते. काँग्रेस पक्षाच्या तत्कालीन दिवंगत नेत्या रईसा शेख यांचे ते भाचे, नगर अर्बन बँकेतील सेवानिवृत्त अधिकारी हाजी मतीन अब्दुल जब्बार शेख यांचे ते थोरले बंधू होत.

## संजय भांगडीया यांचे अल्प आजाराने निधन



नगर - श्रीराम चौकातील श्रीराम टॉवर येथील रहिवासी संजय पन्नालाल भांगडीया (वय ५९) यांचे अल्प आजाराने २ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अनिकेत भांगडिया यांचे ते वडील होत तर नरेंद्र, दीपक, हर्षद, केतन भांगडीया यांचे बंधू होत.


## विनोद मुनोत यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील एमएसईबी कॉलनीतील माणिकनगर येथील रहिवासी विनोद हिरालाल मुनोत (वय ५०) यांचे ४ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी श्रीमती आशा, सिद्धेश, रिदेश ही २ मुले, दिलीप, श्रीकांत व राजेंद्र हे ३ भाऊ, पुतण्या वर्धमान असा परिवार आहे.

## गुलाबचंद पाटणी यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील गुलाबचंद मोहनलाल पाटणी (वय ८४) यांचे ३ ऑगस्ट रोजी रात्री ९ वा. वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शिर्डी येथील पत्रकार किशोर पाटणी व सतीश पाटणी यांचे वडील, गंगापूर येथील व्यापारी राजेश रतनलाल पाटणी यांचे चुलते, शुभम, हर्षल व क्रिश पाटणी यांचे आजोबा होत.

## कैलास पवार यांचे आकस्मिक निधन



श्रीरामपूर - येथील रा.ब.ना.बोरावके कॉलेजचे कर्मचारी, साई मंदिराचे सदस्य कैलास रामचंद्र पवार (वय ५५) यांचे आकस्मिक निधन झाले.त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. चि.मयूर पवार यांचे वडील होत.

## स्फोटक पदार्थांची वाहतूक करणारा मालट्रक पकडला; १३.७९ लाखाचा मुद्देमाल जप्त, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - विनापरवाना स्फोटकपदार्थ (फटाके) जवळ बाळगुन वाहतुक करणारा मालट्रक कोतवाली पोलिसांनी पकडला आहे. ही कारवाई २ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याचे सुमारास अरणगाव ते केडगाव बायपास रोड वरील एमआरएफ टायर शोरुम जवळ करण्यात आली.

या बाबतची माहिती अशी की अरणगाव ते केडगाव बायपास रोडने एक मालट्रक स्फ़ोटक पदार्थ विना परवानगी घेऊन जात असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली. त्यानुसार कोतवाली पोलिसांनी अरणगाव ते केडगाव बायपास रोड वरील एमआरएफ टायर शोरुम जवळ अशोक लेलंड कंपनीचा ट्रक (क्र. एम एच १६ सी डी २१४३) थांबवून ट्रक चालक स्वप्नील कैलास जाधव (वय १९, रा. कणगर ता. राहुरी) यास ताब्यात घेऊन ट्रकची झडती घेतली असता ट्रकमध्ये ६० हजार रुपये किमतीचे १०० बॉक्स ग्रोन क्रॅकर्स फटाके, १ लाख ६० हजार रुपये किंमतीचे १०० बॉक्स ग्रीन पॉप क्रॅकर्स फटाके, ३० हजार रुपये किंमतीचे १५ बॉक्स रोल बार फटाके, २४ हजार रुपये किंमतीचे २० बॉक्स फुलबाजी फटाके, ६ हजार ५०० रुपये किमतीचे ५ बॉक्स जे ग्रीन क्रॅकर्स फटाके, ४९ हजार ४०० रुपये किमतीचे २६ बॉक्स जे ग्रीन क्रॅकर्स फटाके, १० लाख ५० हजार रुपये किमतीचा अशोक लेलंड कंपनीचा मालट्रक असा १३ लाख ७९ हजार ९०० रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. या मालाबाबत ट्रक चालकास विचारणा केली असता हा माल अरणगाव येथील मयुरी हॉटेल पाठीमागे असलेल्या मुलतानी गोडाऊनचे मॅनेजर रामचंद्र तोतराम मुलतानी (रा. सावेडी अंजली बंगला दत्त मंदिराजवळ, अ.नगर) यांचे सांगण्यावरुन गोडाऊन मधून पुणे येथील नारायणशेट बुऱ्हाणी (रा. पिंपरी, पुणे) यांचेकडे घेऊन जात असल्याचे सांगितले. हा माल वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्याकडे कसलाही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलिसांनी मुद्देमालासह ट्रक चालकास ताब्यात घेतले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पो. कॉ. सुरज कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन स्वप्निल जाधव, रामचंद्र मुलतानी, नारायण शेठ बुऱ्हानी यांच्याविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम २८८, २०५१ सह स्फ़ोटक पदार्थ अधिनियम १८८४ चे कलम ५,६९ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात या करीत आहेत.

## भगवान ढवळे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - नागापूर येथील रहिवासी भगवान महादेव ढवळे (वय ५७) यांचे २ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर अंत्यसंस्कार नागापूर अमरधाममध्ये करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना असा परिवार आहे. ओंकार व प्रणव ढवळे यांचे ते वडील होत.

## बांधकाम साईटवरुन वायर व कॉपर पाईपची चोरी

नगर - सावेडी परिसरातील एका बांधकाम सुरु असलेल्या शाश्वत नावाच्या नियोजित हॉस्पिटलच्या साईटवरुन अज्ञात चोरट्यांनी सुमारे ४६ हजार रुपये किमतीची विद्युत वायर व ऑक्सिजन वाहक कॉपर पाईप चोरुन नेले. ही घटना २ ऑगस्ट रोजी रात्री ८ ते ३ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात बद्रीनाथ यशवंत बेरड (वय ६०, रा. दरेवाडी, ता. नगर) यांनी फिर्याद दिली. फिर्यादीत म्हटले आहे की, फिर्यादी यांचा मुलगा आकाश व इतर सहकाऱ्यांनी मिळून सावेडी येथील प्लॉट नं. १०१/ब, नाईक हॉस्पिटल शेजारी, मोहन माणिकलाल कुकरेजा यांच्याकडून भाडेतत्त्वावर पाच वर्षांसाठी जागा घेतली असून, तिथे नव्या हॉस्पिटलचे बांधकाम सुरु आहे. साईटवर तीन मजल्यांवर इंटिरिअर, पीओपी व इलेक्ट्रिकल लाईटिंगचे काम सुरु आहे. २ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजता काम आटोपून सर्वजण घरी परतले. मात्र दुसऱ्या दिवशी ३ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता वायरमन साईटवर गेल्यावर त्याला वायर व पाईप चोरीस गेल्याचे आढळून आले. चोरट्यानी पहिला, दुसरा व तिसरा मजला येथून ४० हजार किमतीच्या इलेक्ट्रिक कॉपर वायर, ६ हजार रुपये किमतीचा आय सी यू रूममधील १२ मीटर लांबीचा ऑक्सिजन वाहक कॉपर पाईप कट करुन ४६ हजार रुपये किमतीची वायर व पाईप चोरून नेले.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात बद्रीनाथ बेरड यांनी दिलेल्या अज्ञात चोरट्यांविरद्ध बी एन एस कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास तोफखाना पोलीस करीत आहेत.

## पार्वतीबाई वाघमारे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - बाभूळगाव (ता.राहुरी) येथील रहिवासी पार्वतीबाई आनंदराव वाघमारे (वय ९३) यांचे २ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर बाभूळगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ४ मुले, सुना, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नागापूर येथील युगल प्रिंटर्सचे रमेश वाघमारे यांच्या त्या मातोश्री होत.

## मुक्ताबाई कोतकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - नगर तालुका गुंडेगाव येथील रहिवासी मुक्ताबाई गोपीनाथ कोतकर (वय ९५) यांचे ४ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांना लाडाने 'जीजी' म्हणत होते. त्यांच्यावर शुढळा नदी तीर्थ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे बापूराव व गंगाराम ही २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## अठरा वर्षीय तरुणी काटवन खंडोबा परिसरातून बेपत्ता

नगर - घरात कोणालाही काही न सांगता एक १८ वर्षाच्या तरुणी कोठेतरी निघून गेल्याची घटना शहरातील काटवन खंडोबा परिसरात १ ऑगस्ट रोजी रात्री ११ ते २ ऑगस्ट रोजीचे सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान घडली.

मुलगी बेपत्ता झाल्याचे समजल्यावर तिच्या घरच्यांनी तिचा नगर शहर, तिच्या मैत्रिणीकडे, नातेवाईकांकडे शोध घेतला असता ती कोठेही मिळून आली नाही.या संदर्भात कोतवाली पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद करण्यात आली आहे. पुढील पोलीस तपास करीत आहे.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती मिरवणुकीत डीजे लावणाऱ्या ९ मंडळाच्या अध्यक्षांवर गुन्हे दाखल

नगर - शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त विविध मंडळांच्या वतीने मिरवणुका काढण्यात आल्या. या मिरवणुकी दरम्यान नियमांचे उल्लंघन करत डीजेच्या कर्णकर्कश आवाजात गाणी लावून मोठ्या प्रमाणात ध्वनीप्रदूषण करण्यात आले. याप्रकरणी तोफखाना व कोतवाली पोलीस ठाण्यात एकूण ९ स्वतंत्र फिर्यादींवरुन मंडळ अध्यक्ष व डीजे चालक मालकाविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या कारवाईत तोफखाना पोलिसांनी निलक्रांती चौक मित्र मंडळाचे अध्यक्ष गणेश अशोक अरमाळे व डीजे चालक कुंदन भालचंद्र विधाते (रा. माळीवाडा), साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जन्मोत्सव समिती लालटाकी मंडळाचे अध्यक्ष राकेश राजु ठोकळ (रा. लालटाकी, अ.नगर) व डीजे चालक रोहित हेमराज आढाव (रा. उरळी कांचन, नायगाव पेठ, हडपसर, पुणे), साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जन्मोत्सव समिती लालटाकी येथील मंडळाचे अध्यक्ष नीलेश बाबासाहेब ससाणे (रा. सिध्दार्थनगर) व डीजे चालक प्रमोद मच्छिंद्र सांळुके (रा. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर), तसेच मंडळ अध्यक्ष रोहित बबन शिंदे (रा. कोठला) व डीजे चालक मनोज मधुकर मगर (रा. जेऊर, ता. अ.नगर), मंडळ अध्यक्ष योगेश बाळासाहेब सोनवणे (रा. सर्जेपुरा, रंगभवन) व डीजे चालक सत्यवान सुर्यवान गोंडगीरे (रा. शेडशिंगे, ता. म्हाडा, जि. सोलापूर), मंडळ अध्यक्ष दीपक दिलीप जाधव (रा. रामवाडी, अहिल्यानगर) व डीजे चालक प्रशांत सोनवणे (रा. कुकाणा, ता. नेवासा) यांच्याविरूध्द सहा गुन्हे दाखल केले आहेत.

कोतवाली पोलिसांनी जय भवानी युवा प्रतिष्ठान, सारसनगर मंडळाचे अध्यक्ष वैभव हरीभाऊ साठे (रा. सारसनगर) व डीजे चालक रमेश पांडुरंग पुंड (रा. कुकाणा, ता. नेवासा), जवान मित्र मंडळ, कोठी मंडळाचे अध्यक्ष अविनाश संजय काळोखे (रा. इंदिरानगर, कोठी) व डीजे चालक नागेश मच्छिंद्र लोखंडे (रा. अहिल्यानगर), अण्णाभाऊ साठे वसाहत मित्र मंडळ माळीवाडा मंडळाचे अध्यक्ष अमित सुरेश वाघमारे (रा. माळीवाडा) व डीजे चालक दत्तात्रय बबन वाढेकर (रा. शिरोली, पुणे) यांच्याविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# सर्व समाजाने लग्न आचारसंहितेचे पालन करून आपल्या संस्कृतीला जपणे महत्त्वाचे

### हभप भास्करगिरी महाराज यांचे प्रतिपादन

नगर – सध्याचे लग्न पद्धती ही आपली जुनी संस्कृती मोडीत काढत आहे. आपल्या संस्कृतीला जपणे हे प्रत्येक समाज घटकाचे काम आहे. त्या पद्धतीने लग्न सोहळा करणे व आपली व समाजाचे निष्ठा बाळगणे हे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन श्री क्षेत्र देवगड संस्थांचे संचालक व राष्ट्रीय संत ह.भ.प. भास्करगिरी महाराज यांनी केले




मराठा लग्न आचारसंहिता संमेलन कोहिनूर मंगल कार्यालय येथे पार पडले. (छाया – लहू दळवी)

आज मराठा लग्न आचारसंहिता संमेलन कोहिनूर मंगल कार्यालय येथे पार पडले, त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी श्रीक्षेत्र डोंगरगण येथील संत हभप जंगले महाराज शास्त्री हे होते. या कार्यक्रमास पद्मश्री पोपटराव पवार, आमदार संग्राम जगताप, माजी आमदार साहेबराव दरेकर आदी उपस्थित होते

पुण्यातील वैष्णवी हगवणे हिच्या आत्महत्येनंतर व समाजातील महिलांवर होणाऱ्या अत्याचार यासंदर्भात अहिल्यानगर शहरातील मराठा समाजातील लोकांनी राज्यात सर्व प्रथम एकत्र येऊन मराठा आचारसंहिता ही तयार केली होती. या संदर्भात पहिले संमेलन कोहिनूर मंगल कार्यालय येथे घेण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत मराठा समाजातील प्रत्येक घटकातील ११ सदस्यांना वीस कलमी आचारसंहितेची शपथ देण्यात. यामध्ये उद्योजक, समाजसेवक, वकील, डॉक्टर, महिला, शिक्षक, पत्रकार तसेच मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड, मराठा महासंघ, मराठा उद्योजक लॉबी, छावा संघटना आदींसह अनेक घटकातील प्रतिनिधी यांना शपथ देण्यात आली

ते पुढे म्हणाले की, आपण स्वतः सुधारण्याचा प्रयत्न करा एका दिवसात बदल घडणार नाही पण एक दिवस असा येईल की, त्या दिवशी संपूर्ण विवाह पद्धती ही बदलती जाणार आहे. आजच्या अनेक विवाहामध्ये जुन्या रूढी परंपरा नष्ट होत आहेत. जात, धर्म, पंथ यापेक्षा आपण मोठे लग्न कसे करू असे अनेक समाजातआहेत. ही प्रवृत्ती मोडीत काढली पाहिजे. मराठा समाजातील या मान्यवरांनी जी आचारसंहिता आपल्यासमोर ठेवली आहे, तिचे पालन आपण जर केले तर इतर समाजही त्याचा आदर्श घेतील. त्यामुळे उचललेले हे पाऊल कौतुकास्पद आहे

यावेळी पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले की, प्रत्येक गावामध्ये या आचारसंहितेचे सामूहिक वाचन होणे गरजेचे आहे. या संहितेचे पालन फक्त मराठा समाजाने नाही तर इतर समाजाने सुद्धा केले पाहिजे. आपलं गाव, आपला देश, आपला प्रदेश, आपले कुटुंब,आपली संस्कृती जपण्याचे काम हे यापुढील काळात सगळ्यांनी केले पाहिजे.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, मराठा म्हणजे महाराष्ट्र. मराठा समाजाने मोठा भाऊ या नात्याने पुढे येऊन त्याचा प्रचार आणि प्रसार करून इतर समाजाला बरोबर घेऊन त्यांनासुद्धा आचारसंहिता पाळण्यासाठी प्रयत्न केले तर अनेक कुटुंबांचे यामुळे भले होऊ शकेल.

माजी आमदार साहेबराव दरेकर म्हणाले, माझ्या घरातील प्रत्येक लग्न अतिशय साध्या पद्धतीने करण्याचा मी प्रयत्न केला आहे. आजची ही चळवळ बीड सह संपूर्ण मराठवाड्यात राबवण्यामध्ये मी गेली अनेक वर्ष सातत्याने प्रयत्न केले आहेत. आज मराठा समाजाने एकत्र येऊन हे उचललेले पाऊल म्हणजे एक नवा आदर्श समाजापुढे घालून दिला आहे.

हभप जंगले महाराज शास्त्री म्हणाले, संस्कृती ही महिलेच्या खांद्यावर असते. महिलेने जर संस्कृतीत आपल्या कुटुंबाला आपल्या मुलांना वाढवले तर समाजापुढे नवा आदर्श निर्माण होईल. समाजाने या गोष्टी स्वीकारणे ही काळाची गरज आहे. एकाच दिवशी हा बदल होणार नाही पण बदलाचे वारे म्हणजे हे संमेलन आहे. समूहाने ठरवले तर काहीही करता येईल. संस्कृतीने समाजाला बांधून ठेवता येईल. आज संतवाणी याच विचाराने महाराष्ट्रात चालू आहे. समाज सुधारण्याचे काम आम्ही मंडळी करत असताना समाजाला याबाबत जागृत करणे व ही आचारसंहिता पालन करण्यासाठी याचा प्रचार आणि प्रसार करणे ही आमची ही तेवढीच जबाबदारी आहे. पुढील काळात वारकरी संप्रदायातील लोक या चळवळीला अधिक व्यापक करतील, असे ते म्हणाले.

प्रारंभी प्रास्ताविक करताना सुकाणू समितीचे प्रमुख समन्वयक उद्योजक एन. बी.धुमाळ म्हणाले, ज्यावेळी पुण्यातील घटना घडली आणि इतर काही घटना घडल्या, त्यातून समाजामध्ये जागृती करण्यासाठी आम्ही आचारसंहिता तयार केली. त्याची अंमलबजावणी ३१ मे पासून सुरू झाली. अनेक जिल्ह्याने ती स्वीकारली तसेच इतर समाजाने पण ती स्वीकारली आहे. ही चळवळ अधिक व्यापक कशी करता येईल हा आमचा विचार असून यासाठी समाज बांधवांनी पुढे येणे गरजेचे आहे. हे करत असताना समाज आर्थिक साक्षर कसा होईल आणि उद्योग क्षेत्रामध्ये समाजातील तरुण मंडळी कसे पुढे येतील, याचा विचार झाला पाहिजे.

यावेळी माजी कुलगुरू सर्जेराव निमसे यांनी या आचारसंहिते मागील भूमिका विशद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा गणेश भगत यांनी केले तर आभार मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष इंजिनिअर सुरेश इथापे यांनी मानले.

याप्रसंगी सुकाणू समितीचे सदस्य सकल मराठा समाजाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत गाडे, प्राचार्य खासराव शितोळे, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष ॲड. स्वाती जाधव, किशोर मरकड, दशरथ खोसे, अशोक कुटे, प्रा. अशोक घोरपडे, ॲड. सुभाष काकडे, सी.ए राजेंद्र काळे, ॲड. सुभाष काकडे, ॲड. भीमराज काकड, ॲड. सुभाष भोर, ॲड. शिवाजी कराळे, डॉ. अविनाश मोरे, मराठा क्रांती मोर्चाचे गोरख दळवी, जिजाऊ ब्रिगेडच्या दक्षिण जिल्हाध्यक्ष नंदिनी सोनाळे, माजी महापौर शीलाताई शिंदे, जिजाऊ ब्रिगेडच्या राज्य सदस्या संपूर्णा सावंत, मराठा पतसंस्थेचे उपाध्यक्ष बाळासाहेब काळे, ज्येष्ठ लेखक संजय कळमकर, ज्ञानदेव पांडुळे, शब्दगंध साहित्य चळवळीचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, उद्योजक हरिभाऊ डोके, शेतकरी संघटनेच्या बापूसाहेब भोसले नगरसेवक बाळासाहेब पवार महिला समितीच्या सदस्या ॲड. अनुराधा येवले, दिलीपराव मिस्कीन, शशिकांत भामरे, सेवानिवृत्त अधिकारी सुरेश मस्के, इंजि. बप्पासाहेब बोडखे, मराठा पतसंस्थेचे संचालक लक्ष्मण सोनाळे, सतीश इंगळे, उदय अनभूले, मराठा सोयरीक संस्थेच्या जयश्री कुटे आदी उपस्थित होते.

## मराठा लग्नाच्या संहितेतील प्रमुख मुद्दे

लग्न सोहळा ३०० ते ५०० लोकांत करावा, प्री–वेडिंग बंद करावे, साखरपुडा हळद व लग्न एकाच दिवशी करण्यात यावे, लग्नात हुंडा घेऊ नये देऊ नये, प्री–वेडिंग बंद करावे, डीजे लावण्या ऐवजी पारंपरिक वाद्य व लोक कलावंतांना संधी द्यावी, कर्ज काढून लग्न करू नयेत, नवरदेवापुढे दारू पिऊन नाचणाऱ्या तरुण–तरुणींना पायबंद घालावा, लग्न सोहळ्यात फक्त वधू आणि वर पित्यानेच फेटे बांधावेत, लग्नात सोन्याची वस्तू गाड्यांच्या चाव्या देऊन देखावा करू नये, रोख स्वरूपात बाहेर देण्याऐवजी पुस्तक द्यावेत, अन्नाची नासाडी थांबवावी, भांडी फर्निचर न देता मुलीच्या नावाने एफडी करावी, मानपान जाण त्यांनीच करावा, सामूहिक विवाह ही काळाची गरज समजून त्यासाठी प्रयत्न करावेत, लग्नानंतर मुलीच्या संसारात मुलीच्या आईकडून मोबाईलवर होणारा हस्तक्षेप बंद करावा, सासरच्या लोकांनी पैशासाठी सुनेचा छळ करू नये, नव उद्योजक व्यवसायिकांना प्रोत्साहन देण्यासाठी उद्घाटन कार्यक्रमात हे ऐपतीप्रमाणे रोख रक्कम किंवा त्याच्याकडून खरेदी करावी, लग्न व दशक्रिया विधी प्रसंगी आशीर्वाद आणि श्रद्धांजली नकोत, उद्योग आणि आर्थिक साक्षरता समाजप्रबोधन करावे आदी मुद्यांवर भर देण्यात आला आहे

# मराठी सोयरिक संस्थेच्या वतीने ८ ऑगस्ट रोजी सर्वजातीय मोफत ऑनलाईन मेळाव्याचे आयोजन

**ऑनलाइन वधू वर मेळाव्याचा लाभ घ्यावा : जयश्री कुटे**

नगर – जगदंब फाउंडेशन संचलित मराठी सोयरिक संस्थेच्या वतीने सर्व जातीय मोफत ऑनलाईन मेळाव्याचं आयोजन करण्यात आले आहे. हा ऑनलाईन मेळावा गुगल मीटवर ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता होणार असल्याची माहिती मराठी सोयरीक संस्थेच्या संचालिका जयश्री अशोक कुटे, डी.जी. पाटील, नानासाहेब दानवे यांनी दिली आहे.

संस्थेने आतापर्यंत ९९ वधू वर परिचय मेळावे घेतलेले आहेत. संस्थेकडून आतापर्यंत ५००० पेक्षा जास्त लग्न जमलेले आहेत. त्यापैकी ६८३ लग्न हे विधवा, विदुर, घटस्फोटीत यांची झालेली आहेत. आता सर्व जातींसाठी हा मोफत ऑनलाईन परिचय मेळावा आयोजित केला असल्यामुळे विविध जिल्ह्यातील अनेक वधू वर या मेळाव्याला जॉईन होणार आहेत. मेळाव्यासाठी ८४५३९०२२२२ या वर ७ ऑगस्टपर्यंत नाव नोंदणी करणे बंधनकारक आहे. नावनोंदणीसाठी वधुवर पालकांनी मुला मुलींचा फोटो बायोडाटा पाठवणे गरजेचे आहे.

मेळाव्यामध्ये वधू–वरांचे पालक देखील जॉईन होऊ शकतात. मेळाव्यामध्ये वधूवरांना समक्ष एकमेकांना बघता येणार आहे. तसेच त्यांना परिचय देण्याची संधी दिली जाईल. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक कुटे हे बायोडाटा वाचन करून दाखवणार आहेत. मेळाव्यामधून देखील अनेक लग्न यापूर्वी जमलेले आहेत, म्हणून वधू–वरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे, प्रमोद झावरे, शशिकांत भांबरे, डॉ. संजयकुमार गायधनी, अन्नपूर्णा ढम, मधुकर निकम, प्रा.योगेश कोतकर, कविता बोंबले, मोहन हेलकुटे, अमोल धनवडे, अभयराज (सागर) मोरे पाटील, राम निकम, मुकुंद टांकसाळे, संपत सोनवणे यांनी केले आहे.

# बेस्ट मॅनेजमेंट कॉलेज इन वेस्ट इंडिया फॉर इंडस्ट्री इंटरफेस २०२५ अवॉर्डने नगर येथील 'डॉ. विठ्ठलराव विखे पाटील रुरल डेव्हलपमेंट कॉलेज' सन्मानित

नगर – डॉ. विठ्ठलराव विखे पाटीलच्या इन्स्टिट्यूट ऑफ बिसनेस मॅनेजमेंट ॲण्ड रूरल डेव्हलपमेंट या संस्थेला सेंटर फॉर एज्युकेशन ग्रोथ ॲण्ड रिसर्चद्वारे बेस्ट मॅनेजमेंट कॉलेज इन वेस्ट इंडिया फॉर इंडस्ट्री इंटरफेस २०२५ अवॉर्ड हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.




हा पुरस्कार २५ जुलै रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या १४ व्या राष्ट्रीय शिक्षण उत्कृष्टता परिषदेत, २५ व्या राष्ट्रीय शिक्षा गौरव पुरस्कार सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

'अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे' (AICTE) संचालक डॉ. सुनील लुथरा यांच्या हस्ते हा महत्त्वाचा पुरस्कार संचालक डॉ. संजय धर्माधिकारी यांनी स्वीकारला. व्यवस्थापन शिक्षण आणि उद्योगाशी असलेल्या उत्कृष्ट संबंधासाठी हा सन्मान मिळाला आहे. डॉ विठ्ठलराव विखे पाटील संस्थाअंतर्गत असलेले आयबीएमआरडी हे कॉलेज अहिल्यानगर मध्ये १९८६ पासून दर्जेदार शिक्षणासाठी प्रसिद्ध आहे.

संस्थेचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील आणि विश्वस्त व मुख्य अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेचे सेक्रेटरी जनरल डॉ. पांडुरंग गायकवाड, मेडिकल कॉलेज व हॉस्पटलचे संचालक डॉ. अभिजित दिवटे, सुनील कल्हापुरे संचालक (तांत्रिक) यांनी कॉलेजला मिळालेल्या यशाबद्दल अभिनंदन केले.

# 'आयएमएस'मध्ये 'ताल साधने' चा शुभारंभ आणि नगरमधील संगीतगुरुजनांचा स्नेहमेळावा उत्साहात

नगर – IMS ॲकॅडेमी ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सर्मध्ये नुकताच 'ताल साधना' या नवीन उपक्रमाचा शुभारंभ आणि नगरमधील संगीत गुरुजनांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात नृत्य, संगीत आणि समूह स्वतंत्र तबलावादनाचे सुंदर सादरीकरण झाले.



आयएमएस ॲकॅडेमी ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सर्मध्ये नुकताच 'ताल साधना' या नवीन उपक्रमाचा शुभारंभ आणि नगरमधील संगीत गुरुजनांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात भरतनाट्यम विभागाच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या 'पुष्पांजली' ने झाली, तर कथक विभागाच्या विद्यार्थिनींनी 'रामभजन' सादर करत कार्यक्रमाला भक्तिमय रंग दिला.

तबल्यावर ज्येष्ठ कलाकार शेखर दरवडे यांनी आपल्या प्रभावी तालसाधनेने उपस्थितांची मने जिंकली. लेहरा संगत संवादिनीवर मकरंद खरवंडीकर व किरण जोशी यांनी गायन लेहरा संगत केली. श्री. दरवडे यांनी तीनताल मध्ये तबल्याचे विविध पैलू उलगडत विलंबित लयीत फरुकाबाद घराण्याचा पेशकार, उठाण, दिल्ली व पंजाब घराण्याच्या शैलीतील कायदे, विविध प्रकारचे तुकडे, मुखडे, परण, चक्रधार, स्तुती परण, स्तुती काव्य परण अशा बहारदार शैलीत सादर केले. त्यांच्या साथीसाठी जय संजय गांधी आणि अनुज शेखर दरवडे यांनी सहवादक म्हणून सहभाग घेतला.

या प्रसंगी खचड चे माजी सरसंचालक डॉ. शरद कोलते आणि संचालक डॉ. एम. बी. मेहता हे उपस्थित होते. डॉ. मेहता यांनी स्वागत करत IMS च्या सांगीतिक कार्याची प्रशंसा केली. त्यांनी सांगितले की, अशा कार्यक्रमांमुळे नगर शहरात संगीताचे संस्कार रुजतील व नव्या पिढीला प्रेरणा मिळेल.

डॉ. शरद कोलते यांनी IMS च्या सुरुवातीच्या टप्प्याची आठवण सांगताना, अकॅडमीच्या विद्यार्थिनींना तत्कालीन राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्यासमोर सादरीकरणाची मिळालेली संधी याची गौरवपूर्ण आठवण सांगितली. कार्यक्रमासाठी IMS च्या समन्वयक डॉ. ऋचा तांदुळवाडकर, शिक्षिका आश्लेषा पोतदार, विजय पाटोळे, नाना भोगाडे, कोतकर व आंतरराष्ट्रीय सूफी गायक पवन नाईक यांनी मेहनत घेतली.

स्नेहमेळाव्यास पत्रकार भूषण देशमुख, संस्कार भारतीचे दिपक शर्मा, सप्तसूरचे डॉ. शिरिष कुलकर्णी, अखिल भारतीय नाट्य परिषद नगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद बेडेकर, अमृता बेडेकर, अनुजा कुलकर्णी, संपदा चौधरी, अपर्णा बाल्टे, शास्त्रीय गायक अनिरुद्ध धर्माधिकारी, गिरीराज जाधव, प्रणव देशपांडे, ओंकार देऊळगावकर, प्रसाद सूवर्णपाठकी, ज्ञानेश्वर दुधाडे, चंद्रकांत पंडित, अनिकेत देउळगांवकर, प्रतीभा धूत, मीनल काळे, सुदाम गडकर, राम शिंदे, हभप गोरक्ष दुतारे व कुलदीप चव्हाण यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ऋचा तांदुळवाडकर यांनी केले आभार मानले.

# अजेंटिक एआयवर डॉ. सचिन कोरडेंचे व्याख्यान; कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नवीन पैलूंवर टाकला प्रकाश

नगर – दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहिल्यानगर स्थानिक केंद्राच्या वतीने २५ जुलै रोजी प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय, लोणी येथील माहिती व तंत्रज्ञान अभियांत्रिकी शाखेचे विभाग प्रमुख डॉ. सचिन कोरडे यांचे अजेंटिक एआयची ओळख या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.



दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहिल्यानगर स्थानिक केंद्राच्या वतीने प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय, लोणी येथील माहिती व तंत्रज्ञान अभियांत्रिकी शाखेचे विभाग प्रमुख डॉ. सचिन कोरडे यांचे अजेंटिक एआयची ओळख या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

डॉ. सचिन कोरडे यांनी आपल्या व्याख्यानात कृत्रिम बुद्धीमत्तेतील अजेंटिक एआय या नवीन प्रारूपाबद्दल माहिती देताना ते स्वत: स्वतंत्रपणे निर्णय कसे घेते, त्यानुसार स्वत:हून योजना आखते, व बदलाशी हुशारीने संवाद साधते याबद्दल सविस्तर माहिती दिली. पारंपारिक एआय आणि एजंटिक एआय मधील फरक स्पष्ट करताना अजेंटिक एआय स्वायत्तपणे कार्य करण्यास सक्षम आहे, बदलाशी जुळवून घेत आहे, तर पारंपारिक AI डेटावर आधारित अंतर्दृष्टी प्रदान करण्याच्या क्षमतेद्वारे परिभाषित केले जाते असे त्यांनी नमूद केले. अनेक उद्योगांमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडत आहे व त्यामध्ये अजेंटिक एआयचा वाटा कसा आहे, हे त्यांनी विशद केले.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला संस्थेचे मानद सचिव डॉ. दीपक विधाते यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. संस्थेचे अध्यक्ष, अभियंता भारतभूषण भागवत यांनी स्वागत केले व व्याख्यात्यांचा सत्कार केला.

कार्यक्रमाला संस्थेचे माजी अध्यक्ष मनोहर अणेकर, माजी मानद सचिव रामनाथ वायकर, हरिश्चंद्र थिगळे व डॉ. विरेन्द्र बारई, सी. जी. मोटगी, भरत वाघ आदि सभासद व विद्यार्थी उपस्थित होते.

# समाजातील सर्व घटक लायन्सच्या सामाजिक चळवळीशी जोडलेले

**राजेंद्र गोयल यांचे प्रतिपादन; लायन्स क्लब व लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांचा पदग्रहण सोहळा, डॉ. संजय असनानी व गुरनूरसिंग वधवा यांनी स्विकारली अध्यक्षपदाची सूत्रे**

नगर – समाजातील गरजूंना आधार देण्याचे काम लायन्स क्लब करत आहे. समाजातील सर्व घटक लायन्सच्या सामाजिक चळवळीशी जोडले गेले असून, शेवटच्या घटकांपर्यंत सेवा देण्याचे कार्य सुरु आहे. लायन्सच्या माध्यमातून समाजात सत्पात्री दान होत असल्याची भावना लायन्सचे द्वितीय प्रांतपाल राजेंद्र गोयल यांनी व्यक्त केली.



अहिल्यानगर शहरातील लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांचा संयुक्तिक पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला.

अहिल्यानगर शहरातील लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांचा संयुक्तिक पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. या पदग्रहण सोहळ्यात अध्यक्षीय भाषणात राजेंद्र गोयल बोलत होते. नगर–मनमाड रोड येथील एका हॉटेल मध्ये झालेल्या या पदग्रहण सोहळ्यात लायन्सच्या अध्यक्षपदाची सूत्रे डॉ. संजय असनानी व लिओ क्लबच्या अध्यक्षपदाची सूत्रे गुरनूरसिंग वधवा यांनी स्विकारली. या सोहळ्यासाठी किरण भंडारी, प्रशांत मनोत, अरविंद पारगावकर, डॉ. अमित बडवे, जस्मितसिंग वधवा, दिलीप कुलकर्णी, प्रणिता भंडारी, धनंजय भंडारे, हरीश हरवाणी, डॉ. मानसी असनानी, अंजली कुलकर्णी, सीए शंकर अंदानी, राजू जग्गी, अनिश आहुजा, किशोर रंगलानी, डॉ. प्रिया मुनोत, प्रिया रंगलानी, रुचिता कुमार, तनिष्क जग्गी, रीत जाजू, आरोही कांगे, पुणे येथील झेड सी विपिन शेठ, सनी वधवा, गगनप्रीत कौर वधवा, किशोर किथानी, मोहित किथानी आदींसह लायन्स व लिओ क्लबचे सदस्य उपस्थित होते.

प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. अंजली कुलकर्णी यांनी गणेश वंदना सादर केली. पाहुण्यांच्या स्वागत किरण भंडारी यांनी केला. लायन्सक्लबच्या सचिवपदी प्रशांत मनोत, खजिनदारपदी दिलीप कुलकर्णी यांची तर लिओ क्लबच्या सचिवपदी हर्ष किथानी व खजिनदारपदी जगज्योत बग्गा यांची नियुक्ती जाहीर करुन त्यांना पदाची सुत्रे सोपविण्यात आली. राजेंद्र गोयल यांनी नूतन पदाधिकारी कार्याची जबाबदारी समजावून व पदाची शपथ दिली. तर नव्याने लायन्स क्लबमध्ये सदस्यत्व घेतलेल्यांना लायन्स लायनिझमची माहिती दिली.

डॉ. संजय असनानी म्हणाले की, लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या माध्यमातून विविध माध्यमातून सेवा कार्य सुरु आहे. कोरोना काळापासून सुरु करण्यात आलेल्या लंगर सेवेत लायन्सचे महत्त्वाचे योगदान राहिले असून, ती सेवा आजही सुरु असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. लायन्सच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देऊन आधार दिला जाणार आहे. तर वंचित घटकातील नागरिकांना आरोग्य सेवा मोफत देण्यासाठी विविध शिबिर घेतले जाणार असून, पर्यावरण संवर्धनासाठी देखील विविध उपक्रम घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

गुरनूरसिंग वधवा यांनी युवक–युवतींच्या सक्षमीकरणासाठी व सामाजिक कार्यात युवकांना जोडण्यासाठी सामाजिक उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला.

लायन्सच्या माजी अध्यक्षा स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सिमरनकौर वधवा यांनी गोवा ते हैदराबाद विमान प्रवासात ३५ हजार फूट उंचीवर एका महिलेचे प्राण वाचवून त्यांनी दाखवलेली तत्परता, वैद्यकीय कुशलता आणि मानवतेची जाणीवेबद्दल त्यांचा या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. लायन्स क्लबच्या युथ एक्सचेंज उपक्रमातंर्गत स्पेन मधून अहिल्यानगर शहरात आलेल्या मारथा ब्रियोनिस व मॅन्युअल रॉड्रिक्स हे देखील या पदग्रहण सोहळ्यात सहभागी झाले होते.

लायन्सच्या मावळत्या अध्यक्षा डॉ. अनघा पारगावकर व लिओ क्लबच्या अध्यक्षा रिधिमा गुंदेचा यांनी मागील वर्षात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली. सूत्रसंचालन डॉ. संतोष माणकेश्वर, ओम भंडारी यांनी केले. हरजितसिंह वधवा यांनी आभार मानले.

# काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदाचा जयंत वाघ यांनी दिला राजीनामा



नगर – अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटी (ग्रामीण) चे अध्यक्ष जयंत रामनाथ वाघ यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी बाळासाहेब थोरात तसेच महाराष्ट्र प्रदेश कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्याकडे राजीनामा सादर केला आहे. ६ फेब्रुवारी २०२४ रोजी त्यांची जिल्हा कमिटी (ग्रामीण) च्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली होती. मात्र, काही वैयक्तिक कारणांमुळे आणि वेळेअभावी पदाची जबाबदारी नीट पार पाडता येत नसल्यामुळे त्यांनी राजीनामा दिल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.पक्षाने आपल्यावर टाकलेल्या जबाबदारी बद्दल त्यांनी पक्षाचे आभार मानले असून केवळ वैयक्तिक कारणावरूनच आपण या पदापासून दूर होत असल्याचे त्यांनी कळवले आहे.

# गोरगरिबांची सेवा हीच गुरुदेव आचार्य आनंदऋषीजी महाराजांची शिकवण

### पेमराज बोथरा यांचे प्रतिपादन; ब्लडप्रेशर व डायबिटीज तपासणी शिबिरास प्रतिसाद

नगर – वडील स्वर्गीय मानकचंदजी बोथरा व मातोश्री स्वर्गीय सौ.जतनबाई बोथरा यांनी दानधर्म करण्याचे संस्कार बोथरा परिवाराला दिले आहेत. बोथरा परिवाराला आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सेवा करण्याचे भाग्य मिळाले आहे. दानधर्म करणे हे नशिबात असले पाहिजे, आई-वडिलांच्या आशीर्वादाने व संस्काराने ही शक्य झाले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे रुग्णसेवेचे कार्य दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे. हॉस्पिटल मधील सर्व डॉक्टर्स नर्सेस व कर्मचारी निस्वार्थ भावनेने रुग्णसेवेचे कार्य करीत आहेत. हॉस्पिटलच्या कार्याचा महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात नावलौकिक आहे. हॉस्पिटलच्या कार्यात बोथरा परिवार व पारस उद्योग ग्रुपच्या वतीने तनमनधनाने सदैव सहकार्य राहील. गोरगरिबांची सेवा हीच गुरुदेव आचार्य आनंदऋषीजी महाराजांची शिकवण आहे, असे प्रतिपादन श्री बडीसाजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा यांनी केले आहे.



राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा.यांच्या जन्मदिनानिमित्त ब्लडप्रेशर, डायबिटीज व सर्व रोग निदान शिबिराचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना उद्योजक पेमराज बोथरा.

राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा.यांच्या १२५ व्या जन्मदिनानिमित्त ब्लडप्रेशर, डायबिटीज व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन उद्योजक पेमराज बोथरा यांच्या हस्ते दिपप्रज्वलाने करण्यात आले. याप्रसंगी संतोष बोथरा, मनीषा बोथरा, सुवर्णा छाजेड, रोहन बोथरा, प्रसन्न बोथरा, श्रेया बोथरा, दर्शिका बोथरा, डॉ.वसंत कटारीया, सतीश लोढा, सुभाष मुनोत, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, वसंत चोपडा, डॉ.गजेंद्र गिरी, डॉ.रविराज गवळी, डॉ. प्राजक्ता पारधे, डॉ.स्वप्नील शिंदे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात स्वर्गीय मानकचंद बोथरा यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त आनंदऋषीजी हॉस्पिटल व जैन सोशल फेडरेशन यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. या शिबिरात ११० रुग्णांची तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. सतिश लोढा यांनी आभार मानले.

# केडगावात ६ ते १३ ऑगस्टदरम्यान साई सच्चरित्र ग्रंथ पारायण सोहळा

### श्री साई बाबा मंदिराच्या वर्धापनदिनानिमित्त धार्मिक उपक्रम



नगर – केडगाव, बँक कॉलनी येथील श्री साई बाबा मंदिर येथे साई सच्चरित्र ग्रंथ पारायण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिराच्या बाराव्या वर्धापन दिनानिमित्त ६ ते १३ ऑगस्ट दरम्यान हा धार्मिक सोहळा रंगणार आहे. परिसरातील भाविकांनी या सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन डॉ. मुकुंद शेवंगावकर यांनी केले आहे.

६ ऑगस्ट रोजी श्री. व सौ. राजू सातपुते यांच्या हस्ते ग्रंथ पूजन करून या सप्ताहाचे प्रारंभ होणार आहे. श्री साई सच्चरित्र ग्रंथ पारायण पाठ श्रीनिवास सहदेव यांच्या मधूर वाणीतून होणार आहे. १२ ऑगस्ट रोजी केडगाव मधून दुपारी ३ वाजता श्री साईबाबा पालखी मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले आहे. १३ ऑगस्टला काकड आरती दिलीप नागरे यांच्या हस्ते होणार आहे. सकाळी माजी नगरसेवक अमोल येवले यांच्या हस्ते आरती होऊन श्री साई कथावाचक माधुरीताई शिंदे (शिर्डी) यांचे प्रवचन होणार आहे. मध्यान्ह आरती आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते होणार आहे. दुपारी १२:३० ते ३ पर्यन्त महाप्रसादचे आयोजन करण्यात आले असल्याचे म्हटले आहे.



आयडियल इंग्लिश स्कूल व स्व. गोपीनाथराव मुंडे ज्युनिअर कॉलेजला पंखे भेट देताना प्रकाश डाळिंबकर

# गोपीनाथराव मुंडे कॉलेज व आयडियल स्कूलला पंखे भेट

नगर – इतरत्र दान करण्यापेक्षा ज्ञानमंदिराला केलेले दान हे कधीही श्रेष्ठच असते, असे प्रकाश डाळिंबकर यांनी रयत प्रतिष्ठान संचलित आयडियल इंग्लिश स्कूल व स्व. गोपीनाथराव मुंडे ज्युनिअर कॉलेज दौलावडगांव, ता. आष्टी या शाळेला पंखे भेट दिले. त्या प्रसंगी बोलत होते.

आज अनेकजण दान-धर्म करतात मात्र देव हा दगडामध्ये नसून तो मनुष्य प्राण्यामध्येच पहावा असे संत गाडेबाबा सांगत असत हे अगदी बरोबरच आहे. त्यामुळेच शाळेस केलेली मदत ही केंव्हाही चांगली व योग्यच राहील त्याकरिता जास्तीत जास्त लोंकांनी इतर ठिकाणी दान करण्यापेक्षा शाळेला सहकार्य करणे गरजेचे आहे. त्यामुळे शिकणाऱ्या मुलांना शैक्षणिक जिवणात त्याचा फायदा होईल, मुले हीच आपल्या देशांचे भविष्य आहेत, तेच उद्याचा भारत देश सक्षम करणार आहेत असेही प्रकाश डाळिंबकर यावेळी म्हणाले.

या प्रसंगी सरपंच भरत (आबा) जाधव म्हणाले डाळिंबकर यांनी केलेले दान हे अतिशय योग्य ठिकाणी केले असून इतरांनी या गोष्टींचा बोध घेण्याची गरज आहे. शाळा हे ज्ञानमंदिर असून तेथे विद्यार्थी घडविण्याचे काम चालू असते.

यावेळी छबुराव (नाना) फसले, गोटीराम कोहोक यांनीही मनोगत व्यक्त केले.

संस्थेचे अध्यक्ष प्रा. सिताराम जाधव या प्रसंगी म्हणाले की मुलांना उन्हाळ्यामध्ये पंखे असल्यामुळे आता त्रास होणार नाही आणि त्यांचे शैक्षणिक जिवन हे सुखकर होईल. डाळिंबकर परिवाराने शाळेला केलेले सहकार्य हे इतरांसाठी नक्कीच दिशा दर्शक ठरेल. या कार्यक्रमासाठी प्रा.अश्विनी विधाते, सौ डाळिंबकर मॅडम, राहुल डाळिंबकर, मनोज पाटील, सागर गणेश, शुभम पवार, अर्जुन जाधव (गुरुजी), रयतचे पोपटराव बनकर, मुख्याध्यापक फकिर मामु, अजिनाथ जाधव, दादासाहेब केरु फसले, उपसरपंच नंदकुमार फसले, दादा कोहोक, रविंद्र चव्हाण, शामद खान (पटेल), रवि कदम, जयश्री फसले, शशीकांत वाघमारे, सलीम शेख हजर होते.

# महिला सक्षमीकरणासह तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी 'संभाजी ब्रिगेड' प्रयत्नशील

### राजेश परकाळे यांचे प्रतिपादन; शेवगाव तालुका विविध आघाड्यांची नवीन कार्यकारिणी जाहीर

शेवगाव – संभाजी ब्रिगेड केवळ राजकीय पक्ष नसून एक सामाजिक चळवळ आहे. चळवळीच्या माध्यमातून महिला, बेरोजगार तरुणांसाठी काम करणे यासाठी महिला सक्षम करणे व तरुणांना विविध व्यवसाय व नोकऱ्यांसाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणे हे ब्रिगेडचे उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांनी केले



शेवगाव येथील मार्केट कमिटीच्या हॉलमध्ये संभाजी ब्रिगेडच्या शेवगाव तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीत बोलताना राजेश परकाळे.

शेवगाव येथील मार्केट कमिटीच्या हॉल मध्ये संभाजी ब्रिगेडच्या शेवगाव तालुक्यातील कार्यकर्त्यांची आढावा बैठक झाली. यावेळी परकाळे बोलत होते. या प्रसंगी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष विजयराव देशमुख, ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा. किसनराव माने, विक्रमराव दारकुंडे, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण गायके, तालुका सचिव नितीन भराट, तालुका कार्यध्यक्ष लहू काळे, जिल्हामहासचिव निलेश बोरुडे, जिल्हा कार्याध्यक्ष शरद जोशी, राजेंद्र राऊत, शेवगाव शहर अध्यक्ष समीर शेख, दिलीप भागवत सर, महेश नलावडे, इंजि. शाम जरे, कल्याण जगदाळे तालुका संघटक मराठा सेवा संघ जिजाऊ ब्रिगेड तालुकाध्यक्ष डॉ. शितल देवढे, शिवमती सातपुते, रवी डोके, बाबा गाढे, विनायक गटकळ, देविदास पातकळ, शेखर मोरे, योगेश चेडे, गौरव मेहेरे, पायघन सर, प्रवक्ते संजय वाघ, सुयोग धस आदी उपस्थित होते.

महिलांच्या सक्षमीकरणावर भर देण्याबाबत परकाळे म्हणाले, महिला सक्षम होतात, तेव्हा संपूर्ण कुटुंब, समाज आणि राष्ट्राची प्रगती होते. त्यामुळे महिलांना सर्वच क्षेत्रांत जागृत करणे गरजेचे आहे, त्यांना स्वाभिमानाने जगता यावे यास्तव विविध व्यवसायांची माहिती व प्रशिक्षण देण्याबाबत संभाजी ब्रिगेड प्रयत्न करत असून तरुणांमध्ये सध्या अविवाहितांचे प्रमाण वाढले असून यामुळे नैराश्य आल्याचे दिसत आहे. नोकऱ्या नाहीत, व्यवसायाचे ज्ञान नाही, भांडवल नाही अशा स्थितीत ब्रिगेड याबाबतही प्रशिक्षण व भांडवल उभारणी बाबत प्रयत्नशील असून तरुणांच्या हाताला काम देणे हे ब्रिगेडचे उदिष्ट आहे. दारुमुक्त गाव व तरुणांना काम या आधारावरच संभाजी ब्रिगेडचा लढा चालत राहील.

संभाजी ब्रिगेड ही हिंदू विरोधी असल्याचाही आरोप केला जात असून तो एका जाणीवपूर्वक रचलेल्या षडयंत्राचा भाग आहे, संभाजी ब्रिगेड कधीही कोणत्याही धर्माविरोधात नसून सत्य, विवेक व बौद्धिकतेच्या जोरावर समाज प्रबोधन करणारी परिवर्तनवादी चळवळ आहे असे विजयराव देशमुख म्हणाले.

याप्रसंगी निलेश बोरुडे म्हणाले सत्ताधारी सरकार सपशेल अयशस्वी असून शेतकरी संकटात आहे, कर्जमाफी, ऊसदर, दुधदर व शेतमालाला हमीभाव याबाबत ब्रिगेड जनआंदोलन उभारणार आहे. यावेळी इंजि. शाम जरे, डॉ. शितल देवढे, विक्रमराव दारकुंडे, सातपुते आदींनी विचार व्यक्त केले.

यावेळी संभाजी ब्रिगेड शेवगावची कार्यकारिणी तालुकाध्यक्ष लक्ष्मण गायके यांनी जाहीर केली. संभाजी ब्रिगेड कुस्ती संघाच्या तालुकाध्यक्षपदी अशोक काकडे, संतोष नाबदे (तालुकाध्यक्ष, शिक्षक आघाडी), गौरव काशिद (तालुका उपाध्यक्ष), गणेश राजेभोसले (तालुकासचिव युवक आघाडी), गणेश मेहेत्रे (तालुका उपाध्यक्ष युवक आघाडी), अल्ताफ शेख (तालुका उपाध्यक्ष, अल्पसंख्यांक आघाडी), दिपक ससाणे (तालुकाध्यक्ष, सामाजिक न्याय विभाग), जमीर शेख (तालुका सचिव, अल्पसंख्यांक आघाडी), अभिषेक उगले (तालुकाध्यक्ष, उद्योजक आघाडी), अमोल तहकीक (तालुका उपाध्यक्ष, उद्योजक आघाडी), ॲड संदीप बर्डे (तालुकाध्यक्ष, वकील आघाडी), तालुका उपाध्यक्ष गणेश चेडे तर तालुका प्रवक्तेपदी अक्षय डांगरे यांची नियुक्ती करण्यात आली

संभाजी ब्रिगेडचे अमोल दाते यांनी स्वागत केले. प्रास्ताविक संजय वाघ, सूत्रसंचलन शरद जोशी यांनी केले. महेश नलावडे यांनी आभार मानले.



केडगावच्या जैन श्रावक संघाच्या नूतनीकरण व सुशोभीकरण कामाचे लोकार्पण करताना आ.संग्राम जगताप.

# जय आनंद, जय आनंदच्या जयजयकारात केडगाव येथील जैन स्थानकाचे लोकार्पण

नगर – केडगावच्या जैन श्रावक संघाच्या जैन स्थानकाचे नूतनीकरण व सुशोभीकरण कामाचे लोकार्पण रविवारी झाले. या कामासाठी आमदार निधीतून १९ लाख ५० हजार रुपयांचा निधी मंजूर केला होता. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते लोकार्पण झाले. सोहळ्यास महासती दिव्यदर्शनजी महाराज व महासती पुनीतदर्शन महाराज, प्रमुख पाहुणे बडीसाजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, माजी नगरसेवक विपुल शेटीया, उद्योजक राजेश भंडारी, केडगाव जैन स्थानकाचे अध्यक्ष अतुल शिंगवी, उपाध्यक्ष मयूर चोरडिया व मधुर बोकरीया, सेक्रेटरी रुपेश गुगळे, सह सेक्रेटरी विपुल कांकरिया व ललित गुगळे, खजिनदार सोहन बरमेचा, सह खजिनदार राहुल शेटीया आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

केडगाव जैन स्थानकात रविवारी रक्षाबंधन उत्साहात साजरा झाला. यानिमित्त जैन साध्वी महासती दिव्यदर्शनजी महाराज व महासती पुनीतदर्शनजी महाराज यांनी आमदार संग्राम जगताप यांना राखी देऊन शुभाशिष दिले. रक्षाबंधनानिमित्ताने उपस्थित सर्व नागरिक राजस्थानी पारंपारिक वेशभूषेत सहभागी झाले होते.

आ.संग्राम जगताप म्हणाले, आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचा जन्म आपल्या नगरमध्ये झाला. त्यांच्या पदस्पर्शाने नगरची भूमी पुनीत झाली हे आपले भाग्य आहे. आनंदऋषी महाराजांच्या विचारावरच काम करत असून त्यांच्या आशीर्वादाने अहिल्यानगरचा विकास करत आहे. पण आज अनेक प्रवृत्ती समाजाला त्रास देण्यासाठी पुढे येत आहेत. या रावण प्रवृत्तीच्या विचाराच्या लोकांचा वेळीच बंदोबस्त करणे आवश्यक आहे. प्रभूरामाने जसे रावणाला मारण्यासाठी शिवधनुष्य उचलले होते; प्रसंगी त्यांना थोपवण्यासाठी मीही शिवधनुष्य उचलले. तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने ही शक्ती माझ्यामध्ये आहे. या शक्तीचा उपयोग मी लोककल्याण व लोकहितासाठी करत सर्वांच्या मागे ठामपणे उभा आहे. आम्ही संयम ठेवून आहोत पण हा संयम किती दिवस बाळगायचा? छत्रपती शिवाजी महाराजांनी जसे आयुष्यभर मुघलांशी लढा देत त्यांचे रिंगण भेदून त्यांच्यावर मात केली; तसे मी ही तुमच्या सर्वांच्या आशीर्वादामुळेच विधानसभा निवडणुकीत त्यांचे रिंगण भेदून निवडून आलो. त्यामुळे तुमच्यासाठी काम करत ऋण फेडणे माझे कर्तव्य आहे.

अतुल शिंगवी म्हणाले, चातुर्मासच्या पावन पर्वकाळात केडगावच्या जैन स्थानकात जप, तप, आराधना चालु असते. जैन स्थानकासाठी २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याने स्थानकला पुनर्वैभव प्राप्त झाले. नूतनीकरणासाठी भरीव निधी दिल्याने जैन समाज त्यांचा कायम ऋणी राहील.

निधी दिल्याबद्दल ज्येष्ठ नागरिक पनालाल बोकरिया, संपतलाल धोका, फुलचंद चंगेडिया, पोपटलाल शिंगवी, रत्नमाला चोरडिया, शशिकला गांधी यांच्या हस्ते आ.संग्राम जगताप यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोहन बरमेचा यांनी केले. मयूर चोरडिया यांनी आभार मानले.

यावेळी प्रकाश चंगेडिया, राजेंद्र पितळे, राजेंद्र शिंगवी, महेश गांधी, गणेश भंडारी, राजु भंडारी, जिनेश मालु, सचिन पोखरणा, राजेंद्र पोखरणा, कमलेश पोखरणा, राजेंद्र शिंगवी आणि प्रकाश चंगेडिया आदींसह गुरुदेव युवा फौंडेशनचे सर्व युवा सदस्य व गुरुदेव महिला मंडळच्या सर्व महिला पदाधिकारी उपस्थित होते. रक्षाबंधन निमित्त पूनम चोरड़िया, मयूरी बाफना, पायल मुथा व सपना मेहेर यांनी आकर्षक सजावट केली.

# सविता रमेश फिरोदिया प्रशालेतील विद्यार्थिनींनी मनपाच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना बांधल्या राख्या

### राखी म्हणजे फक्त बंध नव्हे, तर समाजासाठी समर्पणाचा संदेश : आयुक्त यशवंत डांगे

नगर – शहराच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या महापालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सविता रमेश फिरोदिया प्रशालेच्या विद्यार्थिनींनी रक्षाबंधनाचा सण विशेष पद्धतीने साजरा केला. या उपक्रमात विद्यार्थिनींनी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या मनगटावर राखी बांधून त्यांच्यावरील आपुलकी आणि आदरभाव व्यक्त केला. या प्रसंगी कर्मचाऱ्यांनी देखील आपल्या अनुभवातून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व सांगून त्यांना सामाजिक जबाबदारीची जाणीव करून दिली. काही कर्मचाऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले होते.



शहराच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या महापालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सविता रमेश फिरोदिया प्रशालेच्या विद्यार्थिनींनी रक्षाबंधनाचा सण विशेष पद्धतीने साजरा केला.

या कार्यक्रमास महापालिका आयुक्त यशवंत डांगे, संस्थेचे सचिव र.धो कासवा, विश्वस्त राजेंद्र चोपडा, मनसुखलाल पिपाडा, सचिन डागा, शिवनारायण वर्मा, विनोद कटारिया, माध्यमिक मुख्याध्यापक दत्तात्रय कसबे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका योगिता गांधी, आर्किटेक असोसिएशनचे अध्यक्ष अभिजीत देवी, उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, संजय चांदवले, अनमोल जैन, सुनील जाधव, संकेत पादिर, गौरव मांडगे, संतोष खांडेकर, सहाय्यक उपायुक्त अशोक साबळे, स्वच्छता निरीक्षक प्रशांत रामदिन, प्रशांत चांदवणे, सुरेश वाघ, राजेश तावरे, राजेंद्र सांबार, तुकाराम बांगरे, प्रसाद उमाप, भरत सारवान, ऋषिकेश वाल्मीक आदी उपस्थित होते.

मनपा आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, स्वच्छता ही केवळ पालिकेची जबाबदारी नाही तर ती प्रत्येक नागरिकाची बांधिलकी आहे. या मुलींच्या उपक्रमामुळे स्वच्छता कर्मचार्यांचे मनोबल वाढले आहे. समाजात त्यांच्या कार्याची दखल घेतली गेली पाहिजे. सविता रमेश प्रशालेने घेतलेला पुढाकार प्रेरणादायी आहे. आज विद्यार्थिनींनी कर्मचार्यांना राखी बांधून जो आत्मीयतेचा धागा गुंफला आहे, तो सामाजिक सलोखा आणि आपुलकी वाढवणारा आहे. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचे कार्य सामान्य वाटले तरी त्यामागे खूप मेहनत आणि समर्पण असते. हे विद्यार्थिनींनी ओळखले हे विशेष आहे.

पुढे बोलताना आयुक्त डांगे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता अभियानाचे महत्त्व, डेंग्यूसारख्या आजारांची माहिती, तसेच ओला व सुका कचरा याबाबत सखोल मार्गदर्शन केले. घराघरात स्वच्छता राखणे, कचरा वर्गीकरणाचे पालन करणे, आणि डेंग्यूसारख्या साथीच्या आजारापासून बचाव करण्यासाठी काय काळजी घ्यावी याची माहिती देत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण केली. आजचे विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत, त्यामुळे त्यांना योग्य वयात चांगले संस्कार मिळणे अत्यंत आवश्यक आहे, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

यावेळी संस्थेचे सचिव र.धो. कासवा म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान निर्माण व्हावे या हेतूने आम्ही विविध उपक्रम राबवतो. रक्षाबंधनासारख्या पवित्र सणाचा असा सामाजिक वापर केल्यामुळे विद्यार्थी केवळ पुस्तकी ज्ञानात मर्यादित राहत नाहीत, तर वास्तव आयुष्याकडे पाहण्याची दृष्टी त्यांना मिळते. महापालिकेचे कर्मचारी म्हणजे आपल्या शहराचे रक्षक. त्यांच्याशी संवाद, सलोख्याचा धागा आणि कृतज्ञता व्यक्त करणं ही शिक्षण प्रक्रियेचा एक भाग आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सहानुभूती, कृतज्ञता आणि जबाबदारी निर्माण होते, असेही कासवा यांनी सांगितले.

यावेळी अभिजीत देवी यांनी सांगितले की, या उपक्रमात विद्यार्थिनींनी स्वच्छता कर्मचाऱ्यांना राखी बांधून एक सुंदर सामाजिक संदेश दिला आहे. शहराच्या विकासात, इमारतींच्या रचनेप्रमाणे स्वच्छतेची भूमिका देखील तितकीच महत्वाची आहे. रचना टिकवायची असेल तर ती केवळ भिंतींनी नव्हे तर स्वच्छतेच्या सुदृढ पायावर उभी रहावी लागते. विद्यार्थिनींनी हा धागा कर्मचाऱ्यांच्या मनगटावर बांधून आपले सामाजिक ऋण व्यक्त केले आहे, ही खरोखरच भावूक करणारी गोष्ट आहे, आज आपण स्मार्ट सिटी, ग्रीन बिल्डिंग्स, डेव्हलपमेंट यावर बोलतो, पण हे सगळं प्रत्यक्षात यायचं असेल तर त्याला नीट व्यवस्थापन आणि स्वच्छतेची साथ लागते. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच हे मूल्य शिकवले जात असेल, तर भविष्यात समाज अधिक सजग व जबाबदार बनेल, याची खात्री आहे. शाळेने घेतलेला हा उपक्रम खऱ्या अर्थाने शहरी सौंदर्य आणि माणुसकी यांची सांगड घालणारा आहे. आमच्या आर्किटेक संस्थेच्यावतीने शाळेला विविध उपक्रमांसाठी यापुढे सहकार्य राहिल.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक योगिता गांधी यांनी सांगितले की, आपल्या समाजात काही कार्यकर्ते असे असतात, जे कायम झगडत असतात पण त्यांच्या कार्याची फारशी दखल घेतली जात नाही. स्वच्छता कर्मचारी हे त्यापैकीच एक. म्हणूनच त्यांच्या मनगटावर राखी बांधून त्यांचा सन्मान करणे हे केवळ संस्कार नव्हे, तर समाजप्रबोधनाचा भाग आहे. विद्यार्थिनींनी हा उपक्रम अत्यंत आत्मीयतेने आणि समर्पणाने राबवला. आम्ही विद्यार्थ्यांना पुस्तकातील गोष्टी शिकवतो, पण जीवनातील मूल्यं अशा कृतीतून आत्मसात होतात. रक्षाबंधनासारख्या सणातून सामाजिक भान, समतेचा विचार आणि आदरभाव यांचे शिक्षण घडते, हे या कार्यक्रमातून दिसून आले, असेही गांधी यांनी आपल्या सांगितले. यावेळी राजेंद्र चोपडा यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन श्रीराम खाडे यांनी केले. जयश्री कोदे यांनी आभार मानले. विद्यार्थिनींच्या या उपक्रमाचे पालक, शिक्षक आणि नागरिकांनीही कौतुक केले.

# अनुप्रेक्षाजी म.सा. यांच्या जन्मदिनानिमित्त ५ ऑगस्टला आगरकर मळा येथे भक्तीसंध्या



नगर – आगरकर मळा, जैन स्थानकात विदर्भ सिंहनी प्रभाकँवरजी म.सा यांच्या शिष्या जिनशासन प्रभाविका अनुप्रेक्षाजी म.सा आदि ठाणा-३ यांचा चातुर्मास सुरू आहे. त्यांच्या सान्निध्यात तपस्या, धर्म आराधणा, धार्मिक कार्यक्रम सुरू आहेत. महावीर श्रावक संघाने २० वर्षा नंतर चातुर्मास घेतला असल्याने संघामध्ये पूर्ण उत्साह आहे.

५ ऑगस्ट रोजी अनुप्रेक्षाजी म.सा. यांचा ५३ वा जन्म दिवस असल्याने संघ भव्य एकासना दिवस साजरा करणार आहे. या दिवशी सकाळी ८.३० ते १० यावेळी व्याख्यान व संध्याकाळी ८.३० वा. नाटिका व सौ. भावना बोरा (कासवा) यांचा भक्ति संध्याचा कार्यक्रम संघाच्या प्रांगणात ठेवण्यात आला आहे. श्रूतीप्रभाजी म.सा., ऋजूप्रभाजी म.सा. यांच्या सान्निध्यात हा कार्यक्रम होणार आहे.

भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन महावीर श्रावक संघ, आगरकर मळा अध्यक्ष अभय कोठारी, सचिव गादिया सर, ऋषभ गांधी व सर्व कार्यकरणीने केली आहे.

### सौ. लतिका सुनिल भळगट यांच्या १५ उपवासाची ५ ऑगस्टला पचकावणी



नगर – महावीर श्रावक संघ आगरकर मळा येथे जिन शासन प्रभाविका अनुप्रेक्षाजी म.सा आदि ठाणा-३ यांचा चातुर्मास पुर्ण उत्साहात चालू आहे. अनुप्रेक्षाजी म.सा यांच्या ५३ वा जन्म दिवस भेट म्हणुन सौ. लतिका सुनिल भळगट यांच्या १५ उपवासाची पचकावणी ५ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वा. होणार आहे. उपस्थित राहण्याचे आवाहन भळगट परिवार व श्रावक संघ अध्यक्ष अभय कोठारी यांनी केले आहे.

# अर्थजगत

## दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी
# पीपीएफ की म्युच्युअल फंड?

देशातील सामान्य कुटुंबापासून ते मध्यमवर्गीय नोकरदार व्यक्तीपर्यंत अनेकांसाठी भविष्याच्या आर्थिक सुरक्षिततेचा विचार करताना एक मोठा प्रश्न उभा राहतो, तो म्हणजे दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी कोणता पर्याय निवडावा? सरकारी योजनांवरील विश्वास आणि सुरक्षिततेचा आधार लक्षात घेत अनेक जण सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी म्हणजेच पीपीएफकडे वळतात. तर दुसरीकडे आर्थिक बाजाराच्या वाढीच्या शक्यतेकडे पाहणारे गुंतवणूकदार म्युच्युअल फंडासारख्या पर्यायांमध्ये आपले पैसे गुंतवतात. पण या दोन्हीपैकी कोणता पर्याय अधिक फायदेशीर, अधिक शाश्वत आणि दीर्घकाळासाठी योग्य असा ठरतो, हा खरा विचार करण्यासारखा मुद्दा आहे.

पीपीएफ ही केंद्र सरकारची एक दीर्घकालीन बचत योजना आहे. या योजनेत गुंतवणूक केलेल्या रकमेसह व्याजदराची हमी सरकार देते, यामुळे जोखीम नगण्य असते. यामध्ये १५ वर्षांचा बंदिस्त कालावधी असतो आणि त्या कालावधीत गुंतवलेली रक्कम ठराविक व्याजदराने वाढत जाते. विशेष म्हणजे, या योजनेवरील व्याजदर दर तीन महिन्यांनी ठरवले जात असले तरी, सरकारी हस्तक्षेपामुळे त्यात फारसा मोठा घसरणीचा धोका नसतो. पीपीएफमध्ये गुंतवलेली रक्कम, त्यावरील व्याज आणि अंतिम मिळकत हे सर्व करमुक्त असतात. त्यामुळे दीर्घकाळासाठी नियमित आणि सुरक्षित उत्पन्नाची अपेक्षा असणाऱ्यांसाठी हा एक विश्वासार्ह पर्याय मानला जातो.

दुसरीकडे, म्युच्युअल फंड ही गुंतवणुकीची एक व्यापक आणि व्यावसायिक पद्धत आहे. यात गुंतवणूकदाराची रक्कम एकत्र करून ती शेअर बाजार, कर्जरोखे, सरकारी रोखे किंवा इतर मालमत्तांमध्ये गुंतवली जाते. म्युच्युअल फंडांचे व्यवस्थापन प्रगत आर्थिक तज्ज्ञ करत असल्यामुळे, बाजाराची चाल समजून घेत ठराविक धोरणांनुसार निधीचे वाटप केले जाते. दीर्घकालीन मुदतीसाठी, विशेषतः पाच वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठी, म्युच्युअल फंडांकडून सरासरी १० ते १५ टक्क्यांपर्यंत परतावा मिळाल्याची अनेक उदाहरणांमध्ये दिसून आले आहे. अर्थात, या फायद्यासोबतच बाजारातील चढउतार आणि जोखमीचाही भाग असतो, जो प्रत्येक गुंतवणूकदाराने ध्यानात घेतला पाहिजे.




**थोडक्यात सांगायचं झालं, तर पीपीएफ आणि म्युच्युअल फंड या दोन्ही पर्यायांना आपापली विशिष्ट वैशिष्ट्ये, मर्यादा आणि फायदे आहेत. कोणताही पर्याय पूर्णतः चांगला किंवा वाईट असा नसतो, तो गुंतवणूकदाराच्या गरजांवर आणि उद्दिष्टांवर अवलंबून असतो. म्हणूनच आजच्या गुंतवणुकीच्या बदलत्या काळात फक्त एकाच पर्यायावर अवलंबून न राहता, संतुलित दृष्टिकोन स्वीकारणे अधिक शहाणपणाचे ठरते.**

या दोन्ही पर्यायांच्या तुलनेत एक गोष्ट स्पष्ट होते,पीपीएफ हा स्थिर, जोखीममुक्त आणि सरकारमान्य असा पर्याय आहे, तर म्युच्युअल फंड हा थोडा अधिक धाडसी, पण उत्पन्नाच्या दृष्टीने अधिक शक्यतांचा मार्ग आहे.

पीपीएफमध्ये गुंतवणुकीसाठी मर्यादा असते. दरवर्षी सध्या दीड लाख रुपयांपर्यंतच गुंतवणूक करता येते. त्याचवेळी म्युच्युअल फंडात अशी कोणतीही मर्यादा नसते आणि कितीही रक्कम नियमित हप्त्यांमध्ये गुंतवता येते.

गुंतवणुकीचा उद्देश, वैयक्तिक आर्थिक स्थिती, जोखीम घेण्याची मानसिक तयारी आणि नियोजनाचा कालावधी हे सर्व घटक लक्षात घेऊन योग्य पर्याय निवडला पाहिजे. काही व्यक्तींना करबचतीचा उद्देश असतो, तर काहीजण शिक्षण, घरखरेदी, निवृत्ती या भविष्याच्या खर्चांसाठी गुंतवणूक करतात. अशा वेळी पीपीएफसारखा पर्याय ठराविक मर्यादेपर्यंत उपयोगी ठरतो, पण पुढे वाढीचा वेग हळूहळू मंदावतो. उलट, म्युच्युअल फंडात दीर्घकाळासाठी सातत्याने गुंतवणूक केली, तर चक्रवाढ व्याजाचा प्रभाव अधिक परिणामकारक ठरतो आणि संपत्ती निर्मितीचा वेग वाढतो. ◆◆◆

*गृहकर्जाच्या पात्रतेसाठी सिबिल स्कोअर अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. सिबिल म्हणजे क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्युरो (इंडिया) लिमिटेड. २000 साली स्थापन झालेल्या या संस्थेचा उद्देश व्यक्ती आणि संस्थांची कर्जविषयक माहिती एकत्रित करणे व नोंदवणे असा आहे. कर्ज मिळवण्यासाठीची पात्रता, त्यावरील व्याजदर आणि कर्जाच्या अटी-शर्ती या सर्व बाबी सिबिल स्कोअरच्या आधारे ठरविल्या जातात.*

# गृहकर्ज मिळवण्यासाठी सिबिल स्कोअरचे महत्त्व




**सिबिल स्कोअरचा गृहकर्जावर कसा परिणाम होतो?**

सिबिल स्कोअर हा ३०० ते ९०० या संख्यांमध्ये असणारा त्रिकोणी आकडा असतो, जो संबंधित व्यक्तीच्या आर्थिक व्यवहारांच्या इतिहासावर आधारित असतो. हा स्कोअर वेळोवेळी बदलत असतो. कोणत्याही आर्थिक संस्थेशी संबंधित व्यवहार त्यावर परिणाम करतात.

जितका स्कोअर जास्त, तितक्या गृहकर्ज मिळण्याच्या शक्यता अधिक. ६५० ते ८५० दरम्यानचा स्कोअर समाधानकारक मानला जातो आणि अशा अर्जदारांना सहजपणे कर्ज मंजूर होते.

५५० च्या खाली असलेला स्कोअर धोकादायक मानला जातो आणि अशा लोकांना कर्ज देण्यास बँका किंवा वित्तीय संस्था टाळतात.

**व्याजदरावरही सिबिलचा प्रभाव**

फक्त कर्ज मिळवण्यापुरताच नव्हे, तर त्यावरील व्याजदर ठरवण्यासाठीही सिबिल स्कोअर वापरला जातो. ज्या व्यक्तीचा स्कोअर चांगला असतो, त्यांना तुलनेत कमी व्याजदरावर कर्ज मिळते. कमी व्याजाचा अर्थ म्हणजे मासिक हप्ते (ईएमआय) कमी येतात आणि परिणामी संपूर्ण घराच्या किमतीतही बचत होते. तुम्ही होम लोन कॅल्क्युलेटर वापरून ही



तुलना करू शकता.

सिबिल स्कोअर चांगला असेल, तर पात्रतेच्या अटी सुलभ होतात आणि अर्ज मंजूर होण्याचा वेगही वाढतो.

चांगला स्कोअर असलेल्या अर्जदाराला जास्त रकमेचे कर्ज कमी व्याजदरात मिळू शकते, आणि संपूर्ण प्रक्रिया जलद पूर्ण होते.

**सिबिल स्कोअरवर परिणाम करणारे घटक**

**१. भूतकाळातील आर्थिक व्यवहार** :ह बिलांचे नियमित व वेळेवर भरणे सिबिल स्कोअर वाढवते.

**२. कर्जाच्या रकमेचा एक भागच भरल्यास** : जर तुम्ही केवळ किमान रकमेचीच भरपाई करत असाल (उदा. क्रेडिट कार्ड बिलांमध्ये), तर तुमचा स्कोअर नकारात्मकपणे प्रभावित होतो.

**३. कर्जाचे प्रकार** :ह गृहकर्ज, वैयक्तिक कर्ज, क्रेडिट कार्ड इत्यादी प्रकारांचाही परिणाम स्कोअरवर होतो.

**४. उपलब्ध क्रेडिटचा वापर** :ह तुमच्या क्रेडिट मर्यादेपैकी खूप मोठा भाग वापरणे स्कोअर कमी करते. सामान्यतः फक्त ३०% क्रेडिट वापरणे चांगले मानले जाते. ◆◆◆

## सिबिल स्कोअर कसा सुधारावा?

**१. थकबाकीची वेळेवर परतफेड करा** : ह वेळेवर देयके भरल्यास सिबिल स्कोअर सुधारतो. यासाठी तुम्ही पेमेंट रिमाइंडर लावू शकता. उशिरा भरलेल्या रकमांवर दंडात्मक व्याज आकारले जाते आणि स्कोअर कमी होतो.

**२. जुनी क्रेडिट कार्डस् बंद करू नका** :ह जुन्या क्रेडिट कार्डांचा वापर सुरू ठेवल्यास तुमचा क्रेडिट इतिहास लांबतो. अशा कार्डांचे वेळेवर केलेले पेमेंट दीर्घकाळात सिबिल स्कोअर सुधारण्यासाठी उपयोगी ठरते.

**३. क्रेडिट कार्ड मर्यादा पूर्णपणे वापरू नका : ह** पूर्ण मर्यादा वापरल्यास स्कोअरवर विपरित परिणाम होतो. त्यामुळे अशा मर्यादा ठरवताना तुमचा वापर ३०% च्या आत राहील याची खात्री करा.

**४. अस्तित्वात असलेली कर्जे बंद करा** : गृहकर्ज मिळवण्यासाठी आधीचे कर्जे फेडल्यास नवीन कर्ज मिळण्याच्या शक्यता वाढतात. थकबाकीची संख्या कमी असल्यास वित्तसंस्था तुमच्याकडे अधिक सकारात्मक दृष्टीने पाहतात.

**५. संयुक्त कर्ज घ्या** : तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत संयुक्त नावाने कर्ज घेऊ शकता. यामुळे पात्रता वाढते आणि परतफेडीचा भारही विभागला जातो.

# टीडीएस आणि सीबीडीटीचा दिलासा

आयकर कायद्यानुसार, जर एखाद्या व्यक्तीचा पॅन क्रमांक आधार कार्डाशी लिंक केलेला नसेल आणि त्यामुळे तो निष्क्रिय (इनऑपरेटिव्ह) झाला असेल, तर अशा परिस्थितीत त्या व्यक्तीवर लागू होणारा टीडीएस किंवा टीसीएसचा दर थेट २० टक्क्यांपर्यंत वाढतो. ही तरतूद बऱ्याच व्यावसायिक आणि करदात्यांसाठी अडचणीची ठरत होती. कारण कमी दराने टीडीएस केल्यानंतर जर अशी परिस्थिती उद्‍भवल्यास संबंधितांना आयकर विभागाकडून मोठ्या प्रमाणावर कराची मागणी केली जात होती आणि दंड आकारण्यात येत होता. अलीकडील काळात अनपेक्षितपणे अनेकांना अशा प्रकारे लाखोंच्या नोटिशी मिळू लागल्या होत्या.

ही समस्या लक्षात घेऊन केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (सीबीडीटी) नुकतीच एका सवलतीची घोषणा केली आहे. या निर्णयानुसार, जर टीडीएस आकरणाऱ्या संस्थांनी किंवा व्यक्तींनी काही विशिष्ट अटी पूर्ण केल्या असतील, तर त्यांच्यावर लागणारा डिफरन्शियल टॅक्स आणि त्यावरील दंड व व्याज यापासून सूट दिली जाईल. म्हणजेच, जर तुम्ही नियमांनुसार टीडीएस कापलेला असला आणि नंतर संबंधित व्यक्तीचा पॅन निष्क्रिय असल्याचे निदर्शनास आले, तर तुमच्यावर कोणतीही अतिरिक्त कराची जबाबदारी राहणार नाही. फक्त त्यासाठी संबंधित व्यक्तीने दिलेल्या मुदतीत आपला पॅन पुन्हा सक्रिय केलेला असावा.

अनेक करदात्यांनी अशी तक्रार केली होती की, त्यांनी व्यवहाराच्या वेळी सामान्य दराने म्हणजेच १ टक्के दराने टीडीएस कापलेला होता, पण नंतर आयकर विभागाकडून २० टक्के दरानुसार फरकाची मागणी करण्यात आली. कारण संबंधित व्यक्तीचा पॅन त्यावेळी निष्क्रिय होता. अशी परिस्थिती अनेक प्रॉपर्टी व्यवहारांमध्ये, भाडेकरूंबाबत किंवा कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या बाबतीत निर्माण झाली होती.

● सीबीडीटीच्या या नव्या सर्क्युलरनुसार, जर संबंधित व्यवहार १ एप्रिल २०२४ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत झाला असेल आणि प्राप्तकर्ता व्यक्तीने ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत आपला पॅन पुन्हा सक्रिय केला असेल, तर त्या व्यवहारावरील कमी टीडीएसमुळे आलेल्या कर नोटिशी रद्द करण्यात येतील. यासोबतच अशा प्रकरणांमध्ये कोणताही दंड किंवा व्याज देखील आकारला जाणार नाही.

उदाहरणार्थ, समजा ए नावाच्या व्यक्तीने मे २०२४ मध्ये बी या व्यक्तीकडून एक कोटी रुपयांची मालमत्ता खरेदी केली आणि त्यावर नियमाप्रमाणे एक टक्का म्हणजेच




● सद्यस्थितीत करदात्यांनी काही महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कोणताही व्यवहार करण्यापूर्वी संबंधित व्यक्तीचा पॅन आधारशी लिंक आहे की नाही, हे तपासणे गरजेचे आहे; मग ती व्यक्ती कर्मचारी असो, मालमत्ता विकणारा असो किंवा भाडेकरू असो. तसेच, ज्या व्यक्तीचा पॅन निष्क्रिय आहे त्याला व्यवहारापूर्वीच पॅन सक्रिय करण्याचा सल्ला देणे हितकारक ठरेल. कारण जर पॅन निर्धारित मुदतीत (३० सप्टेंबर २०२५) पुन्हा कार्यान्वित झाला, तरच भविष्यात कोणतीही कर मागणी किंवा दंडाची कारवाई होणार नाही.

एक लाख रुपये टीडीएस कापून जमा केला. परंतु नंतर असे लक्षात आले की बी या व्यक्तीचा पॅन निष्क्रिय होता, तर अशा परिस्थितीत त्यावर २० टक्के दर लागू होतो. त्यामुळे आयकर विभाग त्या विक्रेत्यावर १९ लाख रुपयांची अतिरिक्त मागणी करू शकतो. मात्र आता, जर बीने ३० सप्टेंबर २०२५ पूर्वी आपला पॅन पुन्हा सक्रिय केला असेल, तर ए ला ही अतिरिक्त रक्कम भरावी लागणार नाही.

कर सल्लागार आणि व्यावसायिकांनी त्याचे स्वागत केले आहे. सीबीडीटीचा हा निर्णय अनेक छोट्या-मोठ्या करदात्यांसाठी अत्यंत दिलासादायक आहे, कारण केवळ प्राप्तकर्त्याच्या पॅन निष्क्रियतेमुळे टीडीएस आकारणाऱ्या व्यक्तींना मोठ्या कराची, दंडाची आणि व्याजाची जबाबदारी अकारण सहन करावी लागत होती.

सीबीडीटीचा हा निर्णय कर व्यवस्थेतील पारदर्शकता आणि व्यवहारातील लवचिकता वाढवणारा आहे. यामुळे प्रामाणिक करदात्यांना दिलासा मिळेल आणि भविष्यात कोणतीही अकारण कारवाई टाळता येईल. त्यामुळे सर्व करदात्यांनी याबाबत सजग राहून व्यवहाराच्या आधीच पॅनची स्थिती तपासणे आणि आवश्यक असल्यास ती अपडेट करण्याची सूचना करणे, हे आपले करदायित्व सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक ठरणार आहे. ◆◆◆

# सोशल मीडियातून मिळवलेल्या उत्पन्नासाठी आयटीआर नियमावली

सोशल मीडियाच्या माध्यमातून उत्पन्न मिळवणाऱ्या लोकांसाठी एक नवा कर नियम लागू करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या आयकर विभागाने स्पष्ट निर्देश दिले आहेत की यापुढे यूट्यूब, फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर, टेलीग्राम, ब्लॉग, वेबसाइट, गुगल ॲडसेन्स यांसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरून कमाई करणाऱ्या लोकांना आयटीआर-३ फॉर्मद्वारे आपले उत्पन्न दाखवावे लागेल. याआधी अनेक लोक चुकीच्या आयटीआर फॉर्मद्वारे (आयटीआर-१ किंवा आयटीआर-२) आपली माहिती सादर करत होते, त्यामुळे उत्पन्न विभागाला त्याची शहानिशा करण्यात अडचणी येत होत्या.



आता विभागाने स्पष्टपणे सांगितले आहे की सोशल मीडिया इन्फ्लुएंसर, ब्रँड प्रमोटर्स, डिजिटल कंटेंट क्रिएटर्स, ॲफिलिएट मार्केटिंग करणारे किंवा कोणत्याही प्रकारे इंटरनेटवरून उत्पन्न मिळवणारे व्यक्ती आयटीआर -३ किंवा आयटीआर-४ वापरूनच आपले उत्पन्न जाहीर करतील. त्यासाठी आयकर विभागाने काही नवे व्यवसाय कोडही जाहीर केले आहेत. उदाहरणार्थ, कोड ०९०२९ कंटेंट क्रिएटरसाठी, १६०२१ सोशल मीडिया इन्फ्लुएंसरसाठी, २१००९ ह यूट्यूबरसाठी, २१०१० व्हिडीओ ब्लॉगरसाठी, आणि २१०११ उत्पादन विक्रीसाठी यांचा समावेश करण्यात आला आहे.

या नव्या निर्णयामागील कारण म्हणजे अनेक लोक आपली कमाई चुकीच्या पद्धतीने दाखवून कर भरत नाहीत किंवा टाळतात. यामुळे सरकारचा महसूल कमी होत होता. आता डिजिटल कमाई करणाऱ्यांना योग्य फॉर्म आणि कोड वापरून कर विवरण सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

शेअर बाजारातील ट्रेडिंग करणाऱ्यांसाठीही नियम बदलले आहेत. इंट्राडे, ऑप्शन ट्रेडिंग, वायदा व्यवहार करणाऱ्यांनी देखील आपले उत्पन्न आयटीआर-३ किंवा आयटीआर-४ मध्येच दाखवायचे आहे. त्यासाठी व्यवसाय कोड २१०१० वापरायचा आहे. विभागाने स्पष्ट केले आहे की कोणत्याही चुकीच्या श्रेणीत उत्पन्न दाखवले तर ते करचुकवेगिरी मानले जाईल.

आर्थिक वर्ष २०२३ह२४ मध्ये अशा डिजिटल माध्यमातून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळवणाऱ्या अनेक व्यक्ती आयकर विभागाच्या रडारवर आल्या असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. म्हणूनच आता कोणत्याही प्रकारे इंटरनेटवरून उत्पन्न मिळणाऱ्या प्रत्येकाने आपली माहिती योग्य फॉर्ममध्ये आणि योग्य कोडसह भरणे गरजेचे ठरणार आहे.

एकूणच या निर्णयामुळे पारदर्शकता येणार असून, सोशल मीडिया इन्फ्लुएंसर, यूट्यूबर, ब्लॉगर, कंटेंट क्रिएटर्स यांची करभरणा पद्धत अधिक स्पष्ट होणार आहे. तसेच करचुकवेगिरी रोखण्यात सरकारला यश मिळणार आहे. ◆◆◆

# 'आयपीओ'चे ग्रे-मार्केट

सेबीच्या नियमांना बगल देऊन शेअर्सची खरेदी-विक्री करणाऱ्या 'ग्रे मार्केट'ची गोष्ट रोचक असली, तरी त्यामध्ये लपलेला धोका मोठा असतो. जेव्हा एखाद्या मोठ्या कंपनीचा इनिशियल पब्लिक ऑफर, म्हणजेच आयपीओ येतो, तेव्हा गुंतवणूकदारांच्या जगात त्याची मोठी चर्चा सुरू होते. अशाच वेळी वारंवार कानावर येणारा एक शब्द म्हणजे 'ग्रे मार्केट'. कारण, आयपीओ अधिकृतपणे उघडण्याआधीच त्या कंपनीचे शेअर्स इथे विकले जात असतात.




ग्रे मार्केट म्हणजे काय, हे समजून घेणे आवश्यक आहे. साध्या भाषेत सांगायचे, तर हा एक अनौपचारिक बाजार असतो. येथे कंपनीचे शेअर्स अधिकृत शेअर बाजारात सूचीबद्ध होण्याआधीच खरेदी-विक्री केली जाते. त्यामुळे याला 'अनलिस्टेड मार्केट' असेही संबोधले जाते. कारण या समभागांना विक्रीसाठीची अधिमान्यता मिळालेली नसते.

या बाजारावर कोणतेही नियंत्रण नसते. भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड म्हणजेच सेबीचा यावर अजिबात हस्तक्षेप नसतो. त्यामुळे इथे गुंतवणूक करताना जोखीम प्रचंड वाढते. हे व्यवहार बहुतांश वेळा तेच गुंतवणूकदार करतात जे आयपीओच्या इश्यू किमतीवर सट्टा लावण्याचा प्रयत्न करतात.

आयपीओ येण्यापूर्वी अशा शेअर्सची खरेदी करण्याचे दोन मार्ग प्रचलित आहेत. पहिला म्हणजे काही ब्रोकर अशा अनलिस्टेड शेअर्सचे व्यवहार करतात. त्यांच्या माध्यमातून खरेदी-विक्री केली जाते.

दुसरा मार्ग म्हणजे कंपनीतील कर्मचारी किंवा प्रवर्तकांकडून थेट शेअर्स खरेदी करणे. अनेकदा आयपीओपूर्वी काही कर्मचारी आपले शेअर्स विकण्यास तयार असतात, आणि गुंतवणूकदार त्यांच्याकडून थेट शेअर्स घेतात. मात्र, या दोन्ही प्रकारांमध्ये विश्वासार्हता आणि पारदर्शकता अत्यंत महत्त्वाची ठरते. कारण इथे कोणतीही सरकारी अथवा कायदेशीर सुरक्षा उपलब्ध नसते. ◆◆◆

# युपीआय व्यवहारातील बदलांविषयी...

भारतीय राष्ट्रीय पेमेंट्स महामंडळाने (एनपीसीआय) घेतलेल्या नव्या निर्णयानुसार युपीआय व्यवहारांमध्ये महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. यापुढे प्रत्येक युपीआय व्यवहारानंतर संबंधित युजरला त्याच्या बँक खात्यात उरलेली शिल्लक रक्कम लगेचच स्क्रीनवर दिसणार आहे. आजवर व्यवहार झाल्यानंतर वेगळ्या ॲपवर जाऊन शिल्लक रक्कम तपासावी लागत होती, पण आता तीच माहिती व्यवहाराच्या शेवटीच दिसणार असल्यामुळे वेळेची




बचत होणार आहे .

सध्या एनपीसीआयकडे दररोज कोट्यवधी शिल्लक तपासणीच्या विनंत्या येतात. यामुळे सर्व्हरवर खूप मोठा लोड पडतो. हा ताण कमी करण्यासाठीच एनपीसीआयने नवे तंत्र लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे बँकेच्या सर्व्हरवरील भार कमी होईल आणि वापरकर्त्याला देखील लगेच त्याचे खात्यात किती पैसे उरले आहेत हे समजेल. यामुळे डिजिटल व्यवहार अधिक पारदर्शक आणि जलद होतील.

नव्या नियमांनुसार युपीआय सेवा देणाऱ्या दहा प्रमुख ॲप्ससाठी (जसे की फोनपे, गुगल पे, पेटीएम, भीम ॲप इत्यादी) दररोज फक्त १० वेळा शिल्लक तपासणीची परवानगी असेल. यामुळे अनेकदा विनाकारण खात्याची शिल्लक तपासण्यामुळे निर्माण होणारा अतिरिक्त डेटा लोड कमी होईल. त्यामुळे एकाच दिवशी अनेक वेळा बँक शिल्लक तपासण्याची सवय असलेल्या युजर्सना आता ही मर्यादा लक्षात ठेवावी लागेल.

या नव्या तांत्रिक बदलामुळे काही इतर महत्त्वाचे बदल देखील होत आहेत. उदाहरणार्थ, प्रत्येक युपीआय व्यवहारासाठी वेगळी एपीआय लिंक तयार केली जाईल आणि तीच वापरून संबंधित बँकेच्या सर्व्हरशी थेट संपर्क साधला जाईल. ही प्रक्रिया ३० सेकंदांमध्ये पूर्ण होईल आणि बँकेकडून त्या व्यवहाराची माहिती ३० ते ६० सेकंदांच्या आत एनपीसीआयकडे पोहोचेल.

**काय घडणार? :** * युपीआय व्यवहारानंतर लगेचच शिल्लक रक्कम दिसेल,* शिल्लक तपासणीवर दररोज दहा वेळेची मर्यादा असेल, * बँक सर्व्हरवरील लोड कमी होईल. * एपीआय प्रक्रिया अधिक गतीने आणि काटेकोरपणे पार पडेल, * व्यवहार तपासणीसाठी ३० ते ६० सेकंदांची निश्चित वेळ असणार. या नव्या धोरणामुळे युपीआय प्रणाली अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि जलद होईल. बँकिंग ॲप्सचा वापर करणाऱ्या सामान्य नागरिकांपासून ते छोट्या यावसायिकांपर्यंत सर्वांसाठीच हा बदल उपयुक्त ठरणार आहे. खात्याची माहिती सतत तपासावी लागते अशा वेळेस ही सेवा अधिक मदत करणार आहे. ◆◆◆

## गिफ्ट डीडबाबत सर्वोच्च न्यायालयाचा
# निकाल काय सांगतो?

जर कुणी आपल्या नातेवाईकाला किंवा इतर कोणालाही भेट (गिफ्ट) स्वरूपात मालमत्ता किंवा संपत्ती दिली, तर त्या व्यवहारामागे काही ठोस कायदेशीर प्रक्रिया असते आणि ती नीट समजून घेणे आवश्यक आहे. अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने चेलुबोयिना नागराजू विरुद्ध मोलेती रामुडू या खटल्यात महत्त्वाचा निर्णय दिला असून त्यामध्ये स्पष्टपणे सांगितले गेले की जर एखादी भेट स्वरूपातील संपत्ती वैध पद्धतीने नोंदणीकृत गिफ्ट डीडद्वारे दिली गेली असेल आणि ती स्वीकारलेली असेल, तर दाता व्यक्ती ती एकतर्फी पद्धतीने रद्द करू शकत नाही. जोपर्यंत त्या गिफ्ट डीडमध्ये अशा प्रकारे करार रद्द करण्याचा स्पष्ट अधिकार नमूद केला जात नाही.

● गिफ्ट डीडीबाबत काही मूलभूत गोष्टी समजून घेणे महत्त्वाचे आहे. विद्यमान स्थावर किंवा जंगम मालमत्तेचा स्वेच्छेने आणि कोणतीही आर्थिक देवाणघेवाण न करता केलेला हस्तांतरण व्यवहार म्हणजे गिफ्ट डीड.

● कायद्यानुसार, गिफ्ट डीड ही एक लिखित, साक्षांकित आणि नोंदणीकृत कागदपत्र असणे आवश्यक असते. विशेषतः जर ती स्थावर मालमत्ता असेल, तर ती नोंदणीशिवाय वैध मानली जात नाही आणि ती नंतर कोर्टात ग्राह्य धरली जात नाही.

● जंगम मालमत्तेच्या बाबतीत, केवळ ताबा हस्तांतरित झाल्यानेही भेट पूर्ण मानली जाते. पण स्थावर मालमत्तेसाठी गिफ्ट डीड नोंदविणे अत्यावश्यक असते. अनेकदा लोक मौखिकरित्या किंवा साध्या पत्राने मालमत्ता देण्याचा प्रयत्न करतात, पण असे व्यवहार भविष्यात वाद निर्माण करू शकतात.

● गिफ्ट डीडचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याद्वारे मालकी हक्क तात्काळ व संपूर्णपणे हस्तांतरित होतो. दाता जिवंत असताना ही मालमत्ता हस्तांतरित केली जाते, त्यामुळे त्याच्या इच्छेची खात्री




कोर्टासमोर स्पष्ट होते. यामुळे ही भेट मृत्यूपत्राच्या तुलनेत अधिक बळकट मानली जाते. तसेच एकदा गिफ्ट डीड नोंदवली गेली की ती सहज रद्द करता येत नाही, त्यामुळे प्राप्तकर्त्यास स्पष्ट व न विसरता येणारा मालकी हक्क मिळतो.

● गिफ्ट डीड नोंदविल्यानंतर दात्याला मालमत्तेवर कोणताही हक्क किंवा नियंत्रण उरत नाही. फसवणूक, जबरदस्ती किंवा चुकीचा प्रभाव या अपवादात्मक परिस्थितीशिवाय दाता ती संपत्ती परत मागू शकत नाही.

● केवळ मतपरिवर्तन झाले किंवा प्राप्तकर्त्याशी मतभेद झाले, म्हणून गिफ्ट डीड रद्द करणे कायदेशीर दृष्टिकोनातून ग्राह्य धरले जात नाही.

● या प्रक्रियेत प्राप्तकर्त्याला काही धोकेही असू शकतात. मालमत्ता मिळत असताना त्यावर काही कर्ज किंवा अन्य देयके असतील, तर ती देयकंही प्राप्तकर्त्यावरच येतात. म्हणून गिफ्ट डीड वाचताना त्यातील लपवलेल्या अटी, आर्थिक जबाबदाऱ्या यांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे.

● गिफ्ट डीड चुकीच्या स्वरुपात लिहिली गेली असेल किंवा नोंदणी नसेल, तर भविष्यात ती मालमत्ता विकताना किंवा गहाण ठेवताना अडचणी निर्माण होऊ शकतात.

● म्हणूनच भेट म्हणून मिळणारी मालमत्ता कितीही आकर्षक वाटली, तरी ती स्वीकारताना पूर्ण कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली आहे का, हे तपासणे अत्यंत गरजेचे आहे.

● कोणतीही मालमत्ता केवळ भेट म्हणून घेणे म्हणजे फक्त मालकी हक्क घेणे नसून, त्यामागच्या जबाबदाऱ्याही आपण स्वीकारत आहोत, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. ◆◆◆



सावेडीतील श्री श्रमिक बालाजी भगवतांचा ३२व्या ब्रम्होत्सव निमित्ताने बालाजी मंदिरात कावड आगमन झाले व क्षौर अर्पण करण्यात आले. यावेळी किशोर डागवाले, आसाराम कावरे, मनोज दुल्लम, दत्तात्रय रासकोंडा, रवि दंडी आदी. (छाया – उदय जोशी)

# श्री श्रमिक बालाजी भगवतांचा ३२ व्या ब्रम्होत्सव निमित्ताने बालाजी मंदिरात कावडीचे आगमन, बालाजीला क्षौर अर्पण

नगर – सावेडीतील श्री श्रमिक बालाजी भगवतांचा ३२ व्या ब्रम्होत्सव निमित्ताने बालाजी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम सुरू झाले आहेत. श्रमिक बालाजी महिला भजनी मंडळाचे हरीपाठ व भजन, ह.भ.प. नरसय्या नल्ला स्वामी यांचे प्रवचन तर ह.भ.प. मिलिंद महाराज पतंगे यांचे किर्तन, श्री बालाजी अभिषेक, लक्ष्मीदेवी, पदमावती अभिषेक करण्यात आला.

सांयकाळी कावड आगमन झाले. राजू येमूल, सुनील कोडम, सत्यनारायण म्याना, राजू रासकोंडा, गणेश रंगाटे यांनी कावड आणली त्यांचा सत्कार किशोर डागवाले, आसाराम कावरे, मनोज दुल्लम, दत्तात्रय रासकोंडा, रवि दंडी आदींच्या उपस्थित झाला.

दत्ता रासकोंडा, रवि दंडी यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या. मंदिरात क्षौर अर्पण करण्यात आले. हरीपाठ व संध्या मान्यवरांच्या आरती झाली. ह.भ.प. लक्ष्मीकांत महाराज नल्ला यांचे किर्तन झाले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन संस्थेचे अध्यक्ष विनोद म्याना यांनी केले. यावेळी भाविक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी संस्थेचे सर्वजण परीश्रम घेत आहेत.

# अहिल्यानगरचे भरत झंवर यांचे ॲडव्हान्स मॉन्टेनरिंग कोर्स पूर्ण



नगर – अहिल्यानगर येथील भरत झंवर यांनी हिमाचल प्रदेश मधील अटलबिहारी वाजपेयी इन्स्टिट्यूट ऑफ मॉन्टेनरिंग अँड अलाईड स्पोर्ट, मनाली या संस्थेमधून ॲडव्हान्स मॉन्टेनरिंग कोर्स 'ए ग्रेड' मिळवून यशस्वीपणे पूर्ण केले. यापूर्वी २०१८ मध्ये त्यांनी बेसिक मॉन्टेनरिंग कोर्स सुद्धा 'ए ग्रेड' मिळवून पूर्ण केला होता.

ॲडव्हान्स कोर्समध्ये मानसिक व शारीरिक क्षमता हिमालया मधील प्रशिक्षणाच्या दरम्यान तपासल्या जातात. त्यासाठी अनेक वर्षांपासून सायकलिंग, रनिंग, ट्रेकिंग, चालणे असे विविध व्यायाम सुरूच होते, असे झंवर यांनी स्पष्ट केले.

ॲडव्हान्स मॉन्टेनरिंग कोर्स मध्ये रनिंग, लोड फेरी, रॉक क्लाइंबिंग, स्नो क्राफ्ट, आईस क्राफ्ट, रिव्हर क्रॉसिंग, क्रेवास रेस्क्यू ऑपरेशन, ग्लेशियर ट्रॅव्हलिंग, बुश क्राफ्ट, नॉट प्रॅक्टिस, थेरी व प्रॅक्टिकल च्या परीक्षा आणि एखादे शिखर चढणे – उतरणे, असे ट्रेनिंग दिले जाते.

२६ दिवस सुरू असलेल्या प्रशिक्षणामध्ये भारतातील विविध भागातून ३० मे ते २६ जून कोर्स दरम्यान ४९ सदस्य सहभागी झाले होते.

ॲडव्हान्स मॉन्टेनरिंग कोर्सच्या दरम्यान २० जून रोजी 'ओ पीक' नावाच्या शिखरावर १६००० फुट पर्यंत चढाई यशस्वीपणे केली व भारताचा तिरंगा ध्वज फडकावला.

भविष्यात हिमायतील मोहिमांमध्ये सहभागी होण्याची भरत झंवर यांनी इच्छा व्यक्त केली. गेल्या काही वर्षांपासून नव हिम सह्याद्री ट्रेकर्स या ग्रूप च्या माध्यमातून युवकांसाठी ट्रेक चे आयोजन करतात. संपूर्ण प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी मनली येथील नारायण दत्त, लूदर सेन, करण ठाकूर, निशांत ठाकूर, भुवनेश्वर ठाकूर आदी प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले.




अहिल्यानगर जिल्ह्यातील राजस उद्योग समूहाचे संचालक राजू आर. घुले यांना बर्लिंगटन इस्टेट युनिव्हर्सिटी युएसए कडून मानद डॉक्टरेट पदवी मिळाली.

# 'राजस उद्योग समूहा'चे संचालक राजू घुले यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील राजस उद्योग समूहाचे संचालक राजू आर. घुले यांना बर्लिंगटन इस्टेट युनिव्हर्सिटी युएसए कडून मानद डॉक्टरेट पदवी मिळाली. याबद्दल त्यांचा नवी दिल्ली येथे हस्ते सत्कार करण्यात आला.

नवी दिल्ली येथे २७ जुलै रोजी झालेला इस्टेट युनिव्हर्सिटी युएसए तर्फे आयोजित समारंभात राजू घुले यांना ऑनरी डॉक्टरेट पीएचडी विथ गोल्ड मेडल या मानद पदवीने गौरविण्यात आले. या पदवीद्वारे श्री. घुले यांचे बिझनेस मॅनेजमेंट, स्ट्रॅटेजिक ॲडव्हायजरी आणि क्वालिटी एक्सलन्स या क्षेत्रातील योगदान जागतिक स्तरावर मान्य करण्यात आले. हा सन्मान इंडिया हॅबिटॅट सेंटर, लोधी रोड, नवी दिल्ली येथे कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेसन हॉल (उच्चायुक्त, जमैका दूतावास, भारत) हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. दिनेश शर्मा (राज्यसभा सदस्य व माजी उपमुख्यमंत्री, उत्तर प्रदेश), गेशन दिसानायके (मंत्री-सल्लागार, श्रीलंका उच्चायोग, नवी दिल्ली), राजीव शर्मा (आयएएस निवृत्त), सी. बी. तिवारी (गृह मंत्रालय, भारत सरकार), अति. पो.आयुक्त प्रमोद सोनकर (म.प्र.), सौ. अलका सोनकर (अधीक्षक, इंदूर सेंट्रल जेल), डॉ. पी. के. राजपूत (माजी वरिष्ठ उपाध्यक्ष, कॅडिला फार्मा), श्रीमती एलेना बर्मन (अध्यक्ष,आयएआरसी), डॉ. विक गॅफनी (कायदा शास्त्रज्ञ, ऑस्ट्रेलिया), इंदौर/ऑक्सफोर्ड इंटरनॅशनलचे डॉ. पुनीत कुमार द्विवेदी आणि डॉ. नेहा शर्मा आदि उपस्थित होते.

## डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय व फ्रान्स येथील

# पॅरीस स्कुल ऑफ टेक्नॉलॉजी अॅण्ड बिझनेस यांच्यात सामंजस्य करार

नगर – विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने नुकताच पॅरीस स्कुल ऑफ टेक्नॉलॉजी अॅण्ड बिझनेस, फ्रान्स यांच्यासोबत सामंजस्य करार (MoU) करण्यात आला. यानुसार शैक्षणिक सहकार्यास प्रोत्साहन, संशोधनातील सहकार्य, शैक्षणिक संसाधनांची देवाणघेवाण, फॅकल्टी व स्टुडंट एक्सचेंज, तसेच विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना चालना देणे यावर भर दिला जाणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संधी मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



विळद घाट येथील डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी कॉलेज व फ्रान्स येथील पॅरिस स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी अॅण्ड बिझनेस यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी भारतातील प्रतिनिधी मिहीर क्षीरसागर, अभिजीत दिवटे, प्रा.सुनील कल्हापुरे, प्राचार्य रवींद्र नवथर, डॉ.आर. एस.पडळकर, शशांक सुवर्णपत्की आदी (छाया – विजय मते)

याप्रसंगी पॅरीस स्कुल ऑफ टेक्नॉलॉजी अॅण्ड बिझनेसचे भारतातील प्रतिनिधी मिहीर क्षीरसागर उपस्थित होते. तसेच मेडिकल संचालक डॉ. अभिजीत दिवटे, डॉ. विखे पाटील फाऊंडेशनचे सेक्रेटरी जनरल डॉ.पी.एम. गायकवाड, डायरेक्टर टेक्निकल प्रा.सुनिल कल्हापुरे डॉ. आर.एस. पडळकर, शशांक सुवर्णपत्की व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रविंद्र नवथर आदी उपस्थित होते.

यावेळी मिहिर क्षीरसागर म्हणाले की, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने केलेला हा केवळ करार नसून विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण व तंत्रज्ञानाशी थेट जोडणारा पूल आहे, आमच्या संस्थेला भारतातील तरुणाईची ऊर्जा व नाविन्यपूर्ण विचारसरणी यावर विश्वास आहे. हा करार दोन्ही संस्थांच्या ज्ञान आणि संशोधन क्षमतेत नवी उंची गाठेल.

# एम-सँड युनिट स्थापन करू इच्छिणाऱ्या व्यक्ती व संस्थांनी 'महाखनिज' प्रणालीद्वारे अर्ज करावेत

नगर – नैसर्गिक वाळूला पर्याय म्हणून कृत्रिम वाळू म्हणजेच एम-सँडच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी महसूल व वन विभागामार्फत 'एम-सँड धोरण' जाहीर करण्यात आले आहे. या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यपद्धतीही निश्चित करण्यात आली आहे. एम-सँड युनिट स्थापन करू इच्छिणाऱ्या व्यक्ती व संस्थांनी 'महाखनिज' या ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज करावेत, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वाळूचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. यासाठी मुख्यतः नदी पात्रातील वाळू वापरली जाते. मात्र नद्यांचे पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी वाळूचा योग्य व मर्यादित वापर होणे आवश्यक आहे. त्यामुळे पर्याय म्हणून एम-सँड धोरण तयार करण्यात आले असून, त्याअंतर्गत संपूर्ण उत्पादन एम-सँडचे करणाऱ्या पहिल्या ५० युनिट धारकांना विविध सवलती देण्यात येणार आहेत.

राज्यातील रहिवासी असलेल्या व महाराष्ट्रात नोंदणीकृत व्यक्ती व संस्थांनाच या योजनेत सहभागी होता येईल. महसूल विभागामार्फत, शासकीय जमिनीवरील एम-सँडसाठीच्या खाणपट्टा लिलावामध्ये केवळ एम-सँड युनिट धारकांनाच भाग घेण्याची परवानगी असेल. पहिल्या ५० संपूर्ण एम-सँड उत्पादन करणाऱ्या युनिट धारकांना दगडाच्या स्वामित्व शुल्काची आकारणी केवळ २०० रुपये प्रति ब्रास दराने केली जाईल (सामान्य दर ६०० रुपये). लिलावातून मंजूर झालेल्या खाणपट्टा धारकांकडून लिलावात नमूद दरानुसार शुल्क आकारले जाईल. उद्योग विभागामार्फतही युनिट धारकांना औद्योगिक प्रोत्साहन अनुदान, व्याज अनुदान, वीज दर अनुदान, विद्युत शुल्कात सवलत व मुद्रांक शुल्क माफी अशा विविध सुविधा दिल्या जाणार आहेत. या योजनेविषयी अधिक माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील गौणखनिज शाखेशी, तसेच संबंधित उपविभागीय अधिकारी किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी गंगाधर बाबा छात्रालय गुहा येथे जाऊन त्या विद्यार्थ्यांच्या समवेत फ्रेंडशिप डे साजरा केला.

# श्री रामकृष्णाच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकीतून साजरा केला मैत्रदिवस

नगर – श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी गंगाधर बाबा छात्रालय गुहा येथे जाऊन त्या विद्यार्थ्यांच्या समवेत फ्रेंडशिप डे साजरा केला. संस्थेच्या ज्युनिअर कॉलेजमधील १०० विद्यार्थ्यांनी तसेच कॉलेज व अप्राईज अॅकॅडमीच्या सर्व प्राध्यापकांनी डॉ.अंशू व महेश मुळे यांनी पालकत्व घेतलेल्या राहुरी जवळील गुहा येथील गंगाधर बाबा छात्रलयाला भेट दिली.

येथील इ. पहिली पासून पदवीपर्यंत असलेल्या ७० विद्यार्थ्यांसमवेत त्यांनी विविध प्रकारचे खेळ खेळून त्या विद्यार्थ्यांचे मनोरंजन तसेच त्यांच्यामध्ये प्रेम भाव निर्माण केला. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी या आपल्या नवीन मित्रांना रोजच्या वापरातील उपयोगी अशा ब्रशपेस्ट, साबण, तेल, टॉवेल, बिस्कीट, चॉकलेट, पेन, पेन्सिल, शार्पनर, पट्टी इत्यादी वस्तूंनी युक्त बॅग्स भेट म्हणून दिल्या. त्याचबरोबर रामावतार मानधना चॅरिटेबल ट्रस्टतर्फे तेथील सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे गणवेश वाटप व सुग्रास जेवणाची व्यवस्था केली होती.

तिथे असताना कॉलेजमधील प्रत्येक विद्यार्थी त्या संस्थेतील एका विद्यार्थ्यांचा पूर्ण वेळ मित्र म्हणून बरोबर राहिल्यामुळे त्यांच्यामध्ये घट्ट मैत्री निर्माण झाली व या आपल्या मित्राला भेटायला आम्ही आमच्या आई-वडिलांना बरोबर परत परत येऊ अशी ग्वाही त्यांनी आपल्या नवीन मित्राला दिली. भावपूर्ण वातावरणात छात्रलयाच्या विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या विद्यार्थ्यांना निरोप दिला. या कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष मोहनलाल मानताना यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या संपूर्ण कार्यक्रमासाठी कॉलेजच्या सर्व स्टाफ सह उपप्राचार्य संपदा देशपांडे व अपराईज टीम सह सी ए उमेश डोडेजा व विद्यार्थी यांनी प्रयत्न केले.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करणाऱ्या या प्रकल्पाचे संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन नंदकुमार झंवर, राजेश झंवर, सचिव डॉ.शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक, सर्व कमिटी मेंबर, मुख्याध्यापिका सौ. जेऊरकर, शाळेच्या उपमुख्याध्यापिका सौ. वाधवा, समन्वय सौ. उजगरे व श्री. गुंडू यांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

# आमच्या भागात कशाला आलास असे म्हणत सारसनगर येथे तरुणास टोळक्याकडून मारहाण

नगर – तू आमच्या भागात कशाला आलास असे म्हणून सात ते आठ जणांच्या जमावाने २३ वर्षीय तरुणास शिवीगाळ, दमदाटी करीत लोखंडी रॉड, लाकडी दांडके, व कंबरेच्या बेल्टने बेदम मारहाण केली. ही घटना नगर शहरातील सारसनगर भागातील युनिटी जिममध्ये १ ऑगस्ट रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अतिक हमीद तांबोळी (वय २३, रा. बॉम्बे बेकरी जवळ, जुनाबाजार, नांगरे गल्ली, अ.नगर) यांनी फिर्याद दिली. फिर्यादी हा १ ऑगस्ट रोजी दुपारी सारसनगर येथील युनिटी जिम मध्ये गेला असता निखिल विष्णू हजारे, सोमनाथ उर्फ सोमा, ऋषिकेश काळे (पूर्ण नाव माहित नाही) व इतर सात ते आठ अनोळखी तरुणांनी फिर्यादीस तू आमच्या भागात कशाला आलास, असे म्हणून शिवीगाळ दमदाटी करुन लोखंडी रॉड, लाकडी दांडक्याने व कमरेच्या बेल्टने फिर्यादीच्या पाठीवर उजव्या हातावर पायाला जबर मारहाण करुन ठार मारण्याची धमकी दिली. व जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या प्रतिबंधात्मक आदेशाचा देखील भंग केला .

या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आतिक तांबोळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन निखिल हजारे, सोमनाथ उर्फ सोमा, ऋषिकेश काळे, व इतर ७ ते ८ अनोळखी इसमांविरुद्ध भारतीय दंड संहिता २०२३ चे कलम ११८ (१), ३५१ (२) (३), ३५२, १८९ (२), १९१ (२) (३), १९० तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१चे कलम ३७ (१), ३७ (३) सह कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला.

अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे करीत आहेत.


## ग्रामपंचायत कार्यालय-बोरी, ता.अकोले, जि.अहिल्यानगर
### जाहीर निविदाअंतर्गत खुली निविदा

**जावक क्र. ६६/२०२५**

मा. सरपंच ग्रामपंचायत कार्यालय बोरी, ताः अकोले, जिः अहिल्यानगर हे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मक्तेदारांकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील १५ वा वित्त आयोग कामाच्या निविदा मागवीत आहोत. निविदेचा कोरा नमुना व भरलेली निविदा स्वीकारण्याचा कालावधी दिनांक ०४/०८/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजले पासून ते दिनांक ११/०८/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय, बोरी या ठिकाणी आहे.

| अनु.नं. | कामाचे नाव | कामाची किंमत | योजनेचे नाव | निविदा फी | काम पूर्ण करण्याचा कालावधी | अधिकृत ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रस्ता कॉंक्रीटिकरण करणे. | १,६९,८९६/- | १५ वित्त २५-२६ | २३६/- | ३ महिना | वर्ग ९ वरील |
| २ | पाईप लाईन विस्तारीकरण करणे | ५४,५७०/- | १५ वित्त २५-२६ | २३६/- | ३ महिना | वर्ग ९ वरील |

**अटी व शर्ती :** १) उक्त दोन कामांबाबत निविदा अटी व शर्ती ई. बाबत सर्व तपशील संचामध्ये नमूद केलेला आहे. कोरा निविदा संच दि. ०४/०८/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजलेपासून ते दि. ११/०८/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात रोखीने अथवा धनाकर्षाने भरणा करून उपलब्ध आहे. २) परिपूर्णरित्या भरलेला निविदा संच ग्रामपंचायत कार्यालयात दि.०४/०८/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजलेपासून ते दि. ११/०८/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वा त्यापूर्वी सादर करता येतील. ३) निविदा शक्य झाल्यास दि. १२/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील. ४) निविदा संदर्भात सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५) निविदा अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीने राखून ठेवलेला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी/सरपंच
ग्रामपंचायत कार्यालय-बोरी, ता.अकोले, जि.अहिल्यानगर



## जाहीर नोटीस

**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,(परसेवा) अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्या.अ.नगर**
**महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड, अ.नगर**
**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये**
**भैरवनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, ता.जि.अ.नगर**
**-: विरुद्ध :-**

| अ.नं. | कर्जदार/जामीनदाराचे नाव | दावा क्रमांक | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | कर्जदार श्री. मनोज दत्तात्रय शिंदे<br>पत्ता-दुधसागर सोसायटी ,केडगाव,ता/जि.अहिल्यानगर.<br>जामिनदार-श्री. निलेश संजय शिंदे.<br>पत्ता-कायनेटिक चौक,गुरुदत्त मेन्स पार्लर,अहिल्यानगर. | ००१<br>-------------<br>२०२५ | ९,३०,०१७/- |
| २ | कर्जदार-श्री.गणेश केरप्पा हुच्चे<br>पत्ता- हॉटेल रुपाली ब्राम्हणगल्ली,माळीवाडा,अहिल्यानगर.<br>जामिनदार-श्री.गायकवाड भास्कर हंसराज.<br>पत्ता-ब्लॉक नं.२४ रुम.नं.३३३,पोलीस हेडकार्टर अ.नगर. | १२७<br>-------------<br>२०२५ | २०,९१,५४०/- |

सदर दाव्याचे कामी अर्जदार यांनी सादर केलेल्या अर्जातील प्रतिवादींना पोस्टाने नोटिसा पाठविण्यात आलेल्या आहेत, परंतु प्रतिवादी यांना नोटीस रुजू न झाल्यामुळे,त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने व प्रथम सुनावणीस उपस्थित न राहिल्याने सदरची जाहीर नोटीस देत आहोत. उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतःजातीने अथवा अधिकृत प्रतिनिधीमार्फत दिनांक: १३/०८/२०२५ रोजी सकाळी १२.०० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रासह आपण या कार्यालयात उपस्थित रहावे.

या नोटीसीद्वारे वरील प्रतिवादींना असे कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण सुनावणीस वेळेवर हजर न राहिल्यास अथवा म्हणणे सादर न केल्यास आपल्या गैरहजेरीत आपल्या अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व दावा गुणवत्तेवर निर्णयीत करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. त्याच प्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. म्हणून आज दि. ३०/०७/२०२५ रोजी कार्यालयीन मुद्रेसह ही जाहीर नोटीस देत आहे.

**दिलीप तिजोरे**
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था
अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन, अ.नगर

स्थळ : अ.नगर
दि.३०/०७/२०२५



## अ.नगर तालुका नागरी सहकारी पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्यादित,अहिल्यानगर.

व्यापारी संकुल,१ ला मजला गाळा नं.४ मार्केटयार्ड म.फुले चौक ,जीएस महानगर बँकेजवळ अहिल्यानगर. पिन-४१४००१

जा.क्र. १८७/भैरवनाथ पत/स्थावर मा.वि.जा.१/सन २०२५ दि. ०१/०८/२०२५

### स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहीरनामा क्र. १

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व (२) प्रमाणे तसेच ( महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ (११) (ई) प्रमाणे) ज्या अर्थी **भैरवनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, केंडगाव, ता./जि.अहिल्यानगर** यांनी खाली नमूद केलेल्या थकबाकीदाराविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व (२) प्रमाणे तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ (११) (ई ) प्रमाणे मला मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अहिल्यानगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरून **मी एन.पी.दळवी. विशेष वसुली व विक्री अधिकारी** खालीलप्रमाणे जप्त केलेली स्थावर मालमत्ता थकीत कर्ज रक्कम वसुलीकरिता जाहीर लिलावाने विक्री करीत आहे. तरी स्थावर मालमत्ता लिलावात भाग घेवू इच्छिणाऱ्यांनी खालील नमूद ठिकाणी ,तारखेस व वेळेस उपस्थित रहावे.

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव | दाखला क्र. दिनांक | गाव | स्थावर मिळकत | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वसुली दाखला रक्कम | भूमापन नंबर | क्षेत्रफळ | आकार | लिलावाचे ठिकाण व दिनांक वेळ |
| १ | कर्जदार श्री.ईकबाल शकूर चुडीवाल व सौ.शाहीन ईकबाल चुडीवाल यांची मिळकत | ७३१ / २४/०७/२०२३ | अहिल्यानगर | १६,७९,५९५+ इतर खर्च+ ०१/०४/२०२३ पासून १६.५०% ने व्याज येणे | ३६५१ दिपलक्ष्मी अपार्टमेंट २ रा मजला फ्लॅट नं.३०१ | ५५.७६ | -- | ०४/०९/२०२५ दुपारी १.०० वा |

**टीप : लिलावाचे ठिकाण : पोलिस कॉ.दिपलक्ष्मी अपार्टमेंट, फ्लॅट नं.३०१, अहिल्यानगर, इतर बोजे - उतारे प्रमाणे व चतु:सिमा- मूळ नकाशाप्रमाणे राहील.**

**लिलावातील अटी व शर्ती :** १) कर्जदाराने कर्ज रक्कम पूर्ण भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल. २)लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाचे ठिकाणी वाचून दाखविण्यात येईल. ३) लिलावात कोणासही बोली लावता येईल. ४) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्यांनी रु. २५०००/- रु अनामत म्हणून आदेश प्रसिध्द झालेपासून ते लिलावाचे एक दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात भरावी लागेल. त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. ५) लिलाव मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकर सही करणार वसुली अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. ६) अन्य अटी व शर्ती लिलावाच्या वेळी वाचून दाखवण्यात येईल. ७) लिलावाच्या सविस्तर अटी व शर्ती संस्थेच्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात पहावयास मिळतील. ८) लिलाव स्थगित करणे,रद्द करणे,पुढे ढकलणे इ. अधिकार मे.विशेष वसुली अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.९) सदर मिळकतीवरील दाव्याविषयी अथवा इतर कोणत्याही तिऱ्हाईत इसमाने दावा केलेले हक्क,दावा अथवा हितसंबध याबवत कशाचाही खरेपणाबद्दल हमी दिलेली नाही.

**एन.पी.दळवी**
विशेष वसुली व विक्री अधिकारी,
(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)

स्थळ :- अहिल्यानगर.
दिनांक : ०१/०८/२०२५

